# हक्क मागतोय महाराष्ट्र

## महाराष्ट्राच्या भल्यासाठी
## महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी
## होय, ताकदीने लढू महाराष्ट्राच्या हक्कासाठी!

Scan For More Information

**7030120012**

**मिसकॉल द्या, सहभागी व्हा!**

www.hakkmagtoymaharashtra.com

हक्क मागतोय महाराष्ट्र

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| अर्थव्यवस्था | 3 |
| शेतकरी | 14 |
| सामाजिक न्याय | 21 |
| युवा | 24 |
| गुन्हेगारी | 27 |
| महाराष्ट्र स्वाभिमान | 29 |
| दळणवळण | 33 |
| महिला व बालके | 37 |
| आरोग्य | 41 |
| शिक्षण | 46 |




राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार

**प्रिय महाराष्ट्र जनांनो,**

**सप्रेम नमस्कार...**

शिव-फुले-शाहू-आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांनी उभा राहिलेला आपला स्वाभिमानी महाराष्ट्र, आजही त्यांच्या विचारांवर चालतो. आजपर्यंतच्या मराठी मुलखाच्या इतिहासात आपण कधीच दिल्लीच्या तख्तापुढे झुकलो नाहिये. या जाज्वल्य इतिहासाला कलाटणी देण्याचे अनेक प्रयत्न मागच्या दहा वर्षांत केंद्र आणि राज्यातील भाजप नेतृत्वाखालील सरकारने केले आहेत. पण त्यांच्या या मनसुब्यांना मोडून काढण्याचं काम आजपर्यंत आपण सर्वांनी मिळून केलंय. मराठी जनांना ही दिल्लीची अरेरावी पटलेली नाही, हे आपण लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला कौल देऊन दाखवूनच दिलंय.

मागील अडीच वर्षांत राज्यातील महायुती सरकारने जो काही गोंधळ घातलाय, त्यातून महाराष्ट्र हा बऱ्याच बाजूंवर पिछाडीवर गेलाय. राज्याचा आर्थिक विकास पुर्णपणे खुंटला असून राज्यावर कर्जाचा डोंगर उभा राहिला आहे, राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे, शेतमालाला योग्य भाव मिळत नाहीये म्हणून शेतकरी बांधव हताश झालाय, माता-भगिनींना वाढलेल्या महागाई मुळे घराचे बजेट सांभाळण्यात प्रचंड अडचणी येतायत, युवांच्या हाताला काम मिळत नसल्याने ते हताश झाले आहेत, सरकारी पदे रिक्त असून देखील भरती प्रक्रिया होत नाहियेत, चुकून एखादी भरती प्रक्रिया झालीच तर ती कधी पूर्ण होईल याची कोणालाच खात्री नाहिये, अशा या महायुती सरकारच्या काळ्या कृत्यांचा तथ्यात्मक लेखाजोखा आम्ही आज आपल्या समोर मांडतोय.

या पुस्तकातील मुद्दे वाचल्यानंतर महाराष्ट्रावर प्रेम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला होणारा मनस्ताप आम्ही समजू शकतो. पण ही वेळ मनस्ताप करायची नाहिये, तर आपल्या महाराष्ट्राला या परिस्थितीत ढकलणाऱ्या सत्ताधीशांना धडा शिकवायची आहे. आपण सर्व मिळून हा धडा या भ्रष्ट, लाचार आणि महाराष्ट्रद्रोही महायुतीला नक्कीच शिकवू यात आम्हाला तरी काहीच शंका नाहिये.

**धन्यवाद!**




### 2024 मध्ये महाराष्ट्राच्या तुलनेत उत्तरप्रदेश राज्याला सर्वाधिक निधी मिळाला!

- उत्तरप्रदेश या राज्यासाठी 2023-24 या आर्थिक वर्षात केंद्रीय महसुलातून राज्यांना मिळणारा वाटा तब्बल 1,83,237 कोटी आहे. तर तुलनेत महाराष्ट्राच्या वाट्याला मात्र अवघे 64,524 कोटी रुपयेच आले.
- उत्तरप्रदेश या राज्यासाठी 2024-25 या आर्थिक वर्षात केंद्रीय महसुलातून राज्यांना मिळणारा प्रस्तावित वाटा तब्बल 2,23,737 कोटी आहे. तर तुलनेत महाराष्ट्राच्या वाट्याला मात्र अवघे 78,786 कोटी रुपयेच येणार आहेत.
- केंद्राच्या तिजोरीत महाराष्ट्राचा सर्वाधिक वाटा असताना देखील केंद्र सरकारने महाराष्ट्राकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केलंय. यातून केंद्र सरकारचा अपारदर्शक आणि स्वार्थी कारभार स्पष्टपणे दिसून येत आहे.
- तसेच केंद्रीय अर्थसंकल्प 2024-25 मधील केंद्रीय विकास निधीतील वाटा उत्तरप्रदेशसाठी 25,069 कोटी असून, महाराष्ट्राच्या वाट्याला मात्र केवळ 8,828 कोटी आले आहेत.
- राज्यातून केंद्रात जाणाऱ्या 1 रुपया मागे राज्यांना मिळणारा वाटा आपण बघितला तर यात देखील आपल्याला भेदभाव दिसून येतो. जसे की बिहार जर केंद्र सरकारला 1 रुपया देत असेल तर त्याच्या वाट्याला 7.06 रुपये येतात आणि महाराष्ट्राला 1 रुपयाच्या बदल्यात केवळ 8 पैसे मिळतात, पण राज्यातील महायुती सरकार याबद्दल काहीच बोलताना दिसत नाही. दिल्लीच्या पुढे राज्याचा हक्क मागण्याचे देखील धारिष्ट त्यांच्यात नाहीये.

## वाढता खर्च, कमी वेतनप्रणाली

### राहणीमान खर्च 71% वाढला, मजुरी मात्र 37 टक्क्यांनी कमी!

- गेल्या 5 वर्षात दैनंदिन आवश्यक खर्चामध्ये दोन वेळेच्या जेवणाचा खर्च 71 टक्क्यांनी वाढला आहे. तुलनेत हाती येणारा पगार फक्त 37 टक्क्यांनीच वाढल्याने कुटुंबातील प्रत्येकाला मोठा संघर्ष करावा लागत आहे.
- याहून दुर्दैवी बाब म्हणजे गेल्या 10 वर्षात विजेचे दर दुप्पट झाले असून, प्रत्येक घराचे आर्थिक नियोजन हे या वाढत्या महागाईमुळे कोलमडून गेले आहे.

### अत्यावशक वस्तूंच्या किमतीत झालेली वाढ

- महावितरण ने 2023-24 मध्ये 3% वीज दर वाढ केली होती, तर 2024-25 साठी ही वाढ 6% असणार आहे. आधीच देशात सर्वात महाग वीज वापरत असलेल्या नागरिकांच्या जखमेवर जणू हे मीठ रगडण्या सारखेच आहे.
- गुजरात मध्ये वीज प्रारंभीक स्लॅब मध्ये 3.05 रुपये प्रती यूनिट दराने मिळते, तर महाराष्ट्रात 5.36 रुपये प्रती यूनिट दराने मिळते. शेवटच्या स्लॅब मध्ये देखील हीच परिस्थिती दिसून येते, यामध्ये गुजरात मध्ये 5.20 रुपये दराने मिळणारी वीज महाराष्ट्रात तब्बल 15.56 रुपये प्रती यूनिट दराने मिळते.


| राज्य आणि विजेचे दर | | |
|---|---|---|
| राज्य | प्रारंभीक स्लॅब | शेवटचा स्लॅब (प्रति युनिट / रुपये) |
| महाराष्ट्र | 5.36 | 15.56 |
| गोवा | 1.60 | 4.50 |
| दिल्ली | 3.00 | 8.00 |
| आंध्र प्रदेश | 1.90 | 9.75 |
| गुजरात | 3.05 | 5.20 |
| कर्नाटक | 4.15 | 8.20 |
| मध्य प्रदेश | 1.90 | 9.75 |
| राजस्थान | 4.75 | 7.95 |

- मागच्या दहा वर्षांमध्ये केंद्र आणि राज्य सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे गॅस सिलेंडर 120 टक्क्यांनी, पेट्रोल 38 टक्क्यांनी, डिझेल 46 टक्क्यांनी महाग झाले आहे. यामुळे सर्वसामान्यांना गाडी चालवणे मुश्किल झाले आहे.

| | घरगुती गॅस | पेट्रोल | डिझेल | राईचे तेल | पीठ | दूध |
|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | ₹410 प्रती सिलेंडर | ₹71 प्रती लिटर | ₹55 प्रती लिटर | ₹90 प्रती किलो | ₹22 प्रती किलो | ₹35 प्रती लिटर |
| 2024 | ₹903 प्रती सिलेंडर | ₹97 प्रती लिटर | ₹90 प्रती लिटर | ₹143 प्रती किलो | ₹35 प्रती किलो | ₹60 प्रती लिटर |
| % वाढ | 120% | 38% | 46% | 59% | 59% | 71% |

- जून 2014 ते जून 2024 या दहा वर्षांच्या काळात टोमॅटोची किंमत 134 टक्क्यांनी, तूरडाळीची किंमत 130 टक्क्यांनी, हरभऱ्याच्या डाळीची किंमत 88 टक्क्यांनी, उडीद डाळीची किंमत 78 टक्क्यांनी,

खाद्यतेल 59 टक्क्यांनी, तर दूध 71 टक्क्यांनी आणि कांद्याची किंमत 74 टक्क्यांनी वाढल्या आहेत. त्यामुळे गृहणीना मासिक खर्च भागवणे कठीण झाले आहे.




- भाजीपाल्याच्या वाढत्या किमतीमुळे नागरिकांनी भाजीपाला खरेदीमध्ये 50% कमी केल्याची धकादायक माहीत समोर आली आहे. अर्थात याचे काहीही सोयिरसूतक राज्यातील महायुती सरकारला नाहीये.

## महगाईचा घरगुती बचतीवर झालेला विपरीत परिणाम (भारत)

- केंद्र सरकारच्या सांख्यिकी मंत्रालयाने जारी केलेल्या आकडेवारी वरुन असे दिसून येते की किमती वाढल्याने घरखर्चाचे गणित भागत नसल्याने, कुटुंबांकडून केल्या जाणाऱ्या बचतीवरही विपरीत परिणाम झाला आहे.
- मागील तीन वर्षात कुटुंबांकडून केल्या जाणाऱ्या घरगुती बचतीत तब्बल 9 लाख कोटी रुपयांची घट झाली आहे. त्यामुळे मध्यमवर्गाच्या समोर देखील आर्थिक सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.
- 2020-21 मध्ये कुटुंबांच्या बचतीने 23.29 लाख कोटींचा उच्चांक गाठला होता. परंतु तेव्हापासून बचतीत सातत्याने घट होत आहे. तसेच बँकांकडून घेतलेल्या कर्जाचा बोजाही मागील तीन वर्षात वाढला आहे. 2020-21 मध्ये कुटुंबांवरील बँकांचे कर्ज 6.05 लाख कोटी इतके होते, ते 2022-23 मध्ये 11.88 लाख कोटी इतके झाले आहे.
- महागाई वाढल्याने रोजचा घरखर्च आणि इतर बिले भागवण्यासाठी अनेक कुटुंबांना उसनवारीचा मार्ग पत्करावा लागला आहे. 2022-23 मध्ये उसनवारी तब्बल 73 टक्क्यांनी वाढली. 2021-22 मध्ये 9 लाख कोटी रुपये असलेली उसनवारी 2022-23 मध्ये 15.6 लाख

कोटीवर गेली आहे. सर्वसामान्यांचे जगणे उसनवारी ढकलून राज्य आणि केंद्र सरकार मात्र आपल्या कोटींच्या प्रचार उत्सवात मग्न आहे.

## प्रकल्प स्थलांतर

### वेदांता फॉक्सकॉन आणि टाटा एअरबससारखे 17 मोठे प्रकल्प गुजरातला पळवण्यात आले!

- वेदांता फॉक्सकॉन आणि टाटा एअरबससारखे 17 मोठे उद्योग प्रकल्प हे राजकीय स्वार्थ साधून गुजरातला पळवून नेण्यात आले. त्यामुळे महाराष्ट्रातील मुलांच्या हक्काच्या रोजगारावर कु-हाड चालवून आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र, बल्क ड्रग पार्क, डायमंड बोर्ससारखे प्रकल्प गुजरात व इतर भाजपशासित राज्यात स्थलांतरित करण्यात आले. महाराष्ट्राच्या हक्काच्या 4 लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीला आळा घालण्यात आला. या महाराष्ट्रद्रोहामुळे औद्योगिक क्षेत्राला मोठी उतरती कळा लागलेली आहे.

### बाहेर गेलेले प्रकल्प आणि त्यातून महाराष्ट्राचे झालेले नुकसान

**बाहेर गेलेले प्रकल्प आणि त्यातून महाराष्ट्राचे झालेले नुकसान**

| अनु क्रमांक | प्रकल्पाचे नाव | अपेक्षित गुंतवणूक (कोटींत) | अपेक्षित रोजगार | अपेक्षित स्थळ | कोणत्या राज्यात गेला |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वेदांता फोस्ककॉन | 1.5 लाख कोटी | 1 लाख | तळेगाव, पुणे | गुजरात |
| 2 | बल्क ड्रग प्रकल्प | 3 हजार कोटी | 40 हजार | रोहा, रायगड | गुजरात |
| 3 | टाटा एअर बस | 22 हजार कोटी | 6 हजार | मिहान नागपूर | गुजरात |
| 4 | मेडिकल डिवाइस पार्क | 424 कोटी | 3 हजार | औरंगाबाद | हिमाचल प्रदेश |
| 5 | सॅफ्रन विमान इंजिन प्रकल्प | 1115 कोटी | 500-600 | मिहान, नागपूर | हैदराबाद, तेलंगणा |

## भारतीय सेमीकंडक्टर मिशन मध्ये महाराष्ट्राला डावलण्यात आले

- भारतीय सेमीकंडक्टर मिशन अंतर्गत केंद्र सरकारने 22 सप्टेंबर पर्यंत पाच नवीन सेमीकंडक्टर उत्पादन प्रकल्पांना मान्यता दिली असून, त्यातील चार प्रकल्प गुजरात आणि एक प्रकल्प भाजपशासित आसामला देण्यात आला आहे. महाराष्ट्रात भाजप सरकार असताना देखील, केंद्र सरकारने यासंदर्भात महाराष्ट्राचा विचार केला नाही. यातूनच महायुती सरकारवर केंद्राचा किती विश्वास आहे ते दिसून येते.
- या पाच सेमीकंडक्टर उत्पादन प्रकल्पांत एकूण दीड लाख कोटींची गुंतवणूक होणार असून, त्यातील एक रुपया देखील महाराष्ट्राच्या वाट्याला येणार नाहिये.

## वाढते कर्ज संकट

### 10 वर्षात महाराष्ट्रावरील कर्ज 2.9 लाख कोटींवरुन 7.8 लाख कोटी झाले !

- 2014 साली महाराष्ट्रावरील कर्ज हे 2.9 लाख कोटी होते. 2024 साली हेच कर्ज 7.8 लाख कोटींवर येऊन पोहोचले आहे. या वाढत्या कर्जभारामुळे महाराष्ट्राची आर्थिक स्थिती पूर्णपणे ढासळून गेली आहे.
- कर्जावरील व्याजाचा बोजा 23,965 कोटींवरुन 56,727 कोटींपर्यंत वाढला आहे, ज्यामुळे महाराष्ट्रातील वित्तीय स्थिरता ही पूर्णपणे धोक्यात आली आहे.
- राज्यातील प्रत्येक व्यक्तीच्या डोक्यावर जुलै 2024 मध्ये 62 हजार 941 रुपयांचे कर्ज आहे. महाराष्ट्रात जन्माला येणाऱ्या प्रत्येक मराठी लेकरावर जन्मतःच कर्ज महायुती सरकारच्या दिवाळखोर वृत्तींमुळे निर्माण झाले आहे.
- राज्यावर 7.8 लाख कोटींचे कर्ज असताना देखील महायुती सरकारने 2024-25 या वर्षात जाहिरातींवर तब्बल 270 कोटी खर्च करण्याचा निर्णय घेतला आहे. यातून महायुती सरकारची दिवाळखोरवृत्ती अधोरेखित होते.

## आर्थिक विकासाची घसरण

### आर्थिक विकास दर हा 9.4 टक्क्यांवरुन 7.6 टक्क्यांपर्यंत घसरला, कृषीक्षेत्रातही घसरण

- महाराष्ट्रातील अर्थकारण पूर्णपणे ढासळून गेलेलं आहे. राज्याचा विकासदर 2023 मधील 9.4 टक्क्यांवरुन 2024 मध्ये 7.6 टक्क्यांपर्यंत घसरल्याने महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ठप्प झाली आहे.
- ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या कृषी क्षेत्रावर देखील विपरीत परिणाम झाला असून, हा कृषीविकास दर 4.5 टक्क्यांवरुन 1.9 टक्क्यांपर्यंत घसरलेला आहे.
- कृषी क्षेत्र वृद्धीदराबाबत महाराष्ट्र सहाव्या क्रमांकावर गेला आहे. तेलंगना, उत्तरप्रदेश यासारखी राज्ये महाराष्ट्राच्या पुढे आहेत.

- औद्योगिक वृद्धीदरात 5.5 टक्क्यांपर्यंत घसरण झाली असून महाराष्ट्र हा उत्तरप्रदेश, तामिळनाडू सारख्या राज्यांच्याही मागे पडला आहे.

## सरकारी नोकऱ्यांचे संकट

### 2.5 लाख पदे अद्याप रिक्त, बेरोजगारीत वाढ

- राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालानुसार सरकारी नोकऱ्यांमध्ये अद्याप 2.5 लाख जागा रिक्त असून यातून सरकारची रोजगाराबाबत उदासीनता स्पष्ट होते. त्यामुळे बेरोजगारीत आमूलाग्र वाढ होत असून, सार्वजनिक सेवा वितरणावरही मोठा परिणाम होत आहे.

## समृध्दीत अधोगती

### दरडोई उत्पन्नात महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावरून थेट सहाव्या क्रमांकावर!

- एकेकाळी आर्थिक समृद्धीमध्ये अग्रेसर असलेला महाराष्ट्र आता भारताच्या सर्वोच्च दरडोई उत्पन्नात थेट दुसऱ्या क्रमांकावरून अत्यंत वाईट पध्दतीने सहाव्या स्थानावर घसरलेला आहे. 2014 साली महाराष्ट्राचं दरडोई उत्पन्न 1,25,260 ₹ इतके होतं आणि गुजरातचं दरडोई उत्पन्न 1,13,139 ₹ इतकं होतं. तुलनेत 2024 ला गुजरात राज्य महाराष्ट्राच्या पुढे गेलं असून गुजरातचं दरडोई उत्पन्न 2,73,558 ₹ इतके असून पिछाडीवर असणा-या महाराष्ट्राचं दरडोई उत्पन्न 2,52,389 ₹ इतकं झालं आहे. यातून महाराष्ट्राची सर्वांगीण प्रगती ही मोठ्या प्रमाणावर थांबून राहिल्याचे स्पष्ट होते.
- राज्यातील 11 जिल्ह्यांचे दरडोई उत्पन्न राष्ट्रीय दरडोई उत्पन्नापेक्षा कमी आहे. या अकरा जिल्ह्यांत परभणी, बीड, गोंदिया, नांदेड, अमरावती, यवतमाळ, हिंगोली, बुलढाणा, नंदुरबार, गडचिरोली आणि वाशिमचा समावेश आहे.

## सहकारी बँका आणि संस्थांची दुर्दशा

### 2014 पासून 60 बँका बंद, 2023 मध्येच 17 बँका बंद

- 2014 पासून तब्बल 60 बँका बंद पडल्यामुळे सहकारी बँकिंग क्षेत्र हे डबघाईला आले आहे. एकट्या 2023 मध्ये 17 बँका बंद झाल्या असून ही अतिशय निषेधार्ह बाब आहे. लहान सहकारी बँकांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्याची सरकारची भूमिका यातून स्पष्ट होते. केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्याकडून सहकार क्षेत्राकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. गेल्या 10 वर्षात महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाने, दूध उत्पादक संघ, सहकारी बँका अशा विविध सहकारी संस्थांवर दबाव टाकून स्वतःचा राजकीय फायदा करून घेण्याचं काम भाजपने केलं.
- राज्य सरकारच्या नागरी पतसंस्था या केंद्र सरकारच्या मल्टीस्टेट पतसंस्थाच्या समोर कमजोर केल्या जात आहेत, त्यामुळे राज्यातील नागरी पतसंस्था वरून ठेवीदारांचा विश्वास कमी झाला आहे. या

परिस्थितीत देखील राज्य सरकार केंद्रीय सहकार मंत्र्यांच्या दबावाखाली येऊन बघ्याची भूमिका घेत आहे.

- खासगी कंपन्यांचे आक्रमक मार्केटिंग, सहकारी दूध संघांचे गैरव्यवस्थापन आणि राजकीय हस्तक्षेप यांचा फटका राज्यातील सहकारी दूध संघाना बसला आहे. महानंद सारखी डेअरी दैनंदिन खर्च भागावण्यात देखील कमी पडत आहे, अशी कबुली राज्याच्या दुग्ध विकास मंत्र्यांनी विधीमंडळात दिली आहे.

## गुंतवणूक आणि स्टार्टअप कोलमडले

### स्टार्टअप फंडिंगमध्ये 60% घट, 15% परकीय गुंतवणुकीत घट

- 2022 ते 2023 दरम्यान स्टार्टअप फंडिंगमध्ये आपत्तीजनक 60% घट झाल्याने महाराष्ट्राचे आर्थिक इंजिन कोलमडून पडले आहे. आणि 2023 ते 2024 पर्यंत थेट परकीय गुंतवणुकीत 15% घट झाली आहे. महाराष्ट्रातील नाविन्यता आणि समृध्दी या गोष्टींना चाप लावण्याचं काम सरकारने केलेलं आहे.

## महाराष्ट्रातील गुंतवणुकीत झालेली कमतरता

- महाराष्ट्राच्या आर्थिक सर्वेक्षणानुसार महाविकास आघाडी सरकारच्या कालावधीत महायुती सरकार पेक्षा जास्त प्रमाणात गुंतवणूक झालेली दिसून येते; दोन्ही सरकारच्या काळातील गुंतवणूक पुढील प्रमाणे आहे.

**महाविकास आघाडी -** 2020 – 44,188 कोटी रुपये
2021 – 2,77,335 कोटी रुपये
**महायुती -** 2022 मध्ये 38,986 कोटी रुपये
2023 मध्ये 59,551 कोटी रुपये

**संबंधित राज्यांमध्ये औद्योगिक प्रकल्प मंजूर**

| राज्य | 2021 | | 2022 | | 2023 | |
|---|---|---|---|---|---|---|
| | प्रकल्प | गुंतवणूक (₹ कोटी) | प्रकल्प | गुंतवणूक (₹ कोटी) | प्रकल्प | गुंतवणूक (₹ कोटी) |
| आंध्र प्रदेश | 47 | 9,373 | 54 | 16,137 | 51 | 12,238 |
| गुजरात | 214 | 92,566 | 191 | 1,00,089 | 190 | 62,535 |
| कर्नाटक | 114 | 61,726 | 103 | 70,695 | 66 | 21,097 |
| **महाराष्ट्र** | **273** | **2,77,335** | **232** | **38,986** | **264** | **59,551** |
| तामिळनाडू | 115 | 29,636 | 68 | 9,383 | 94 | 20,010 |
| तेलंगणा | 41 | 4,614 | 34 | 5,887 | 59 | 13,242 |
| उत्तर प्रदेश | 114 | 17,278 | 71 | 10,375 | 70 | 21,577 |
| **भारतात एकूण** | **1,489** | **7,71,428** | **1,185** | **4,24,101** | **1,267** | **5,10,852** |

## मॅग्नेटिक महाराष्ट्र

- गेल्या अडीच वर्षांत महायुती सरकारने मॅग्नेटिक महाराष्ट्र ही गुंतवणुकीसाठीची परिषद आयोजित केलेली नाहीये. 2023 मध्ये राज्य सरकारने पंतप्रधानांच्या वेळेच्या अनुपलब्धतेमुळे ही शिखर परिषद रद्द केली. ज्यामध्ये 3 लाख 30 हजार रोजगार संधी निर्माण होण्याची क्षमता होती. तसेच व्हायब्रंट गुजरातमुळे ही परिषद रद्द केल्याची देखील कुणकुण आहे.
- 2021 मध्ये कोविड-19 महामारी असून देखील, मॅग्नेटिक महाराष्ट्र 2.0 चे आयोजन माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाविकास आघाडी सरकारने केले होते. ज्यामध्ये 56 करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या, ज्यात एकत्रितपणे महाराष्ट्रात 1.13 लाख कोटीची गुंतवणूक झाली.

| अनु क्रमांक | आर्थिक वर्ष | गुंतवणूक (USD million) |
|---|---|---|
| 1 | 2020-21 | 16,170 |
| 2 | 2021-22 | 15,439 |
| 3 | 2022-23 | 14,806 |
| 4 | 2023-24 | 15,116 |

## भ्रष्टाचाऱ्यांना आसरा

### महाराष्ट्रात लाचखोरी, घोटाळेबाजांना पाठीशी घालण्याचं महायुतीचं काम.

- 2022 आणि 2023 या दोन्ही वर्षी सर्वाधिक भ्रष्टाचाराची प्रकरणे नोंदवली गेलेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्राचा पहिला क्रमांक लागला. 2022 साली 773 तर 2023 मध्ये तब्बल 749 प्रकरणं नोंदवली गेली. प्रशासकीय अधिका-यांसोबतच भाजपकडून भ्रष्टाचारी मंत्र्यांनाच पाठीशी घालण्याचं काम महाराष्ट्रात होत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार, खा. सुनील तटकरे, खा. प्रफुल पटेल, खा. अशोक चव्हाण, खा. नारायण राणे, मंत्री विजयकुमार गावित, आ. भावना गवळी, आ. प्रताप सरनाईक, आ. यामिनी जाधव, आ. गणेश नाईक, मंत्री हसन मुश्रीफ, नेते हर्षवर्धन पाटील यासारख्या नेत्यांनी घोटाळ्याच्या चौकशीपासून दूर राहता यावे म्हणून भाजपसोबत जाण्याचा मार्ग स्वीकारला.

- एसीबीने 2023 मध्ये दाखल केलेल्या प्रकरणांपैकी तब्बल 94 टक्के प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत. याचे मुख्य कारण राजकीय हेतूने प्रेरित कारवाई करून भीतीचे वातावरण तयार करणे असून त्यामुळे ही प्रकरणे तडीस जात नाहीत. महायुती सरकारच्या राजकीय सुडबुद्धी आणि अकार्यक्षमतेमुळे केवळ 8.2% प्रकरणातच न्यायालयात दोषसिद्धी झाली आहे.
- इंडियन एक्सप्रेसच्या शोध आहवालातून असे समोर आले आहे की, 2014 ते 2024 मध्ये विरोधी पक्षातून भाजप मध्ये गेलेल्या 25 मोठ्या नेत्यांपैकी 23 नेत्यांना थेट दिलासा मिळाला असून त्यांची चौकशीतून मुक्तता झाली आहे. त्यात महाराष्ट्रातील 12 नेते आहेत.
- या दहा वर्षांच्या कालावधीत भाजपात विरोधी पक्षातले जे 25 दिग्गज गेले त्यात काँग्रेसचे 10, राष्ट्रवादी काँग्रेसचे 4, शिवसेनेचे 4, टीएमसीचे 3, टीडीपीचे दोन, तर सपा आणि YSRCP च्या प्रत्येकी एका नेत्याचा समावेश आहे.
- भ्रष्टाचाराच्या 20% प्रकरणांमध्ये महायुती सरकारच्या विविध विभागांनी लाच लुचपत विभागाला चार्जशीट दाखल करण्याची परवानगी प्रलंबित ठेवली आहे. म्हणजेच महायुती सरकार भ्रष्ट अधिकाऱ्यांना पाठीशी घालून आपल्याच मंत्र्यांना तर वाचवत नाहिये ना? असा प्रश्न निर्माण होतोय.
- आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात दोन तृतीयांश प्रकरणांमध्ये चौकशीची मागणी राज्य सरकारकडे प्रलंबित आहे. डिसेंबर-2023 ते मार्च 2024 मध्ये नगरविकास विभागात 81, महसूल विभागात 45, ग्रामीण विकास विभागात 40, सार्वजनिक बांधकाम विभागात 33 तर आरोग्य विभागात 17 परवानग्या प्रलंबित आहेत.

## अजूनही प्रतीक्षेत...

**चार महिन्यांहून अधिक काळ प्रलंबित असलेल्या ला.प्र.वि* चौकशी सुरु करण्याच्या विनंत्या**

| विभाग | |
|---|---|
| नगर विकास | 81** |
| महसूल | 45 |
| ग्रामीण विकास | 40 |
| सार्वजनिक बांधकाम | 33 |
| आरोग्य | 17 |

*लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

**81 पैकी 2 विनंत्या 90 दिवसांखाली प्रलंबित आहेत.

# भूखंड हस्तांतरनातील महायुती सरकारचे कारनामे (आरोप)

- मंत्री संजय राठोड यांच्या खाजगी सचिव विशाल राठोड यांनी मंत्र्यांच्या लेटरहेडवर सिडकोला पत्र पाठवून सामाजिक कार्यासाठी देण्यात येणारी जमीन ही मंत्र्यांच्या संस्थेला हस्तांतरित करण्यासाठी दबाव निर्माण केला. यातून नवी मुंबईतील पाच हजार सहाशे चौरस मीटरचा भूखंड मंत्र्यांची संस्था असलेल्या अखिल भारतीय बंजारा सेवा संघाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. यावर बंजारा समाजाच्या इतर संघटनांनी आक्षेप घेतला आहे.
- भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या 'महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी' संस्थेला नवीन महाविद्यालय तसेच तंत्रशिक्षण व नर्सिंग महाविद्यालय सुरु करण्यासाठी पाच हेक्टर जागा देण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. वित्त आणि महसूल विभागाचा विरोध डावलून रेडीरेकनर दरानुसार सुमारे पाच कोटींची ही जमीन नाममात्र दरात देण्यात आली आहे.




## दुष्काळाकडे दुर्लक्ष

### 73% महाराष्ट्र दुष्काळग्रस्त, कोणतीही मदत नाही.

- महाराष्ट्राचा 73% भाग हा अधिकृतरीत्या दुष्काळग्रस्त म्हणून घोषीत आहे. तसेच ऐन जून महिन्यात 18 जिल्ह्यांमध्ये पावसाची कमतरता नोंदवण्यात आली. परंतु राज्य सरकारकडून कोणतेही दुष्काळी मदतीचे पॅकेज जाहीर करण्यात आले नव्हते. योग्य पंचनामे न झाल्याने दुष्काळासह आर्थिक संकट बळीराजावर ओढवले.

### कोरड्या दुष्काळा नंतर आता राज्यात ओला दुष्काळ, पण महायुती सरकार अजूनही सुस्त

- केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आंध्र प्रदेश आणि तेलंगना राज्याचा दौरा करुन पूरग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ 3,448 कोटींची मदत देण्याची घोषणा केली. मात्र केंद्रीय कृषिमंत्री महाराष्ट्रात अद्याप पाहणी करण्यासाठी देखील आलेले नाहीत. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना केंद्र सरकार दुय्यम वागणूक देताना दिसत आहे.
- राज्यातील विविध भागात अतिवृष्टी मुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाई संदर्भात पंचनामे होण्यास दिरंगाई प्रशासकीय पातळीवर होत असून महायुती सरकारची शेतकऱ्यांच्या प्रती असलेली असंवेदनशीलता यातून अधोरेखित होत आहे.
- एकट्या सांगली जिल्हातील मिरज, वाळवा, शिराळा आणि पलूस या चार तालुक्यातील 116 गावांतील 25000 शेतकऱ्यांची 9000 हेक्टर जमीन पाण्याखाली गेली आहे.

# शेतकऱ्यांना मिळेना ठिबक सिंचनाच्या अनुदान

- 2023 सालचे शेतकऱ्यांचे ठिबक सिंचनाचे अनुदान, केंद्र सरकारकडे 306 कोटी तर राज्य सरकारकडे 272 कोटी प्रलंबित आहे. केंद्र आणि राज्य सरकारकडे शेतकऱ्यांचे एकूण 578 कोटी रुपये प्रलंबित असल्याने त्यांना आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत आहे.
- गेल्या वर्षीचे अनुदान मिळाले नसल्याने यंदा डीलर आणि वितरकांनी राज्य सरकारच्या पोर्टलवरून नोंदणी केली नाहीये, याचा देखील फटका शेतकऱ्यांना बसत आहे.

# कर्जमाफीचा फज्जा

## कर्जबाजारी शेतकऱ्यांची फसवणूक, यंत्रणांमध्ये बिघाड

- 2017 मध्ये 30,500 कोटी रुपयांची कर्जमाफी जाहीर करण्यात आली होती, परंतु अद्याप या घोषणेचा किती शेतकऱ्यांना लाभ झाला याची काही माहिती समोर आली नाही. 2019 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या राजवटीत "सॉफ्टवेअरमधील" त्रुटींमुळे 6.56 लाख शेतकऱ्यांना 2 लाख रुपयांच्या कर्जमाफीपासून वंचित राहावे लागले आहे, अशा शेतक-यांचीही संख्या अधिक आहे. संकटात सापडलेल्या बळीराजाला कुठलाही दिलासा मिळालेला नाही.
- नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा फक्त शब्दच देण्यात आला, पण त्यांना अद्यापही प्रोत्साहनपर अनुदान देण्यात आले नाहीये.
- ज्या शेतकऱ्यांनी पीक कर्जाची परतफेड नियमित केली होती ते या कर्जमाफीच्या सवलतीपासून वंचित राहिले. त्यांना 50 हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर रक्कम देण्याची योजना सरकारने जाहीर केली; मात्र नियमांच्या जंजाळात कोल्हापूर जिल्ह्यातील 12 हजारांवर शेतकऱ्यांचे 46 कोटी रुपये अडकले आहेत.

# साखर उद्योग संकट

## कुचकामी धोरणं आणि कर्जातील गैरव्यवस्थापनामुळे साखर कारखाने संकटात

- इथेनॉल उत्पादनासाठी ऊसाचा रस वापरण्यावर बंदी कायम आहे आणि एमएसपी 42 रु. प्रति किलो इतकाच ठेवण्यात आला आहे. 13 साखर कारखानदारांना 1,898 कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले असून यामध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटातील आठ नेत्यांचा आणि भाजपमधील नेत्यांचा समावेश आहे. लोकसभा निवडणुकीतील निकालात मोठा पराभव गाठीशी आल्यानंतर ऐन निवडणुकीच्या तोंडावर भाजपच्या मर्जीतील नेत्यांच्या साखर कारखान्यांनाच कर्जासाठी केंद्राकडून मदत करण्यात आली आहे.

- राज्यातील साखर कारखान्यांमधील सहवीज निर्मितीची क्षमता उपयोगात आणण्यात शासनाला अपयश आले आहे.
    - सहवीज निर्मितीत राज्याकडून उत्तम कामगिरी होण्याची शक्यता असतानाही दुर्लक्ष केले गेले. राज्यात 2020 मध्ये सहवीज निर्मितीचे पहिले धोरण जाहीर केले गेले. त्यानुसार 2025 पर्यंत राज्यात 1350 मेगावॅट सहवीज निर्मितीचे उद्दिष्ट ठेवले होते. परंतु केवळ धोरण जाहीर करून काहीच उपयोग झाला नाही.
    - कारण त्यासाठी अत्यावश्यक पाठबळ साखर कारखान्यांना मिळाले नाही. परिणामी, आतापर्यंत राज्यात केवळ 350 मेगावॅटचे सहवीज खरेदी करार झाले. त्यातही प्रत्यक्षात वीज खरेदी 270 मेगावॅट क्षमतेची झाली आहे.
    - याचे आणखी एक मुख्य कारण फक्त 4.75 रुपये प्रती यूनिट भाव साखर करखान्याना मिळतो, जो पूर्वी 6.50 ते 7 रुपये होता.

## आयात-निर्यात धोरणात सावळा गोंधळ

### चुकीच्या धोरणांमुळे सोयाबीन आणि कांदा उत्पादक शेतकरी उद्ध्वस्त !

- सोयाबीनवरील आयात शुल्क सवलतींमुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. सोयाबीनवरील आयात शुल्क हे 17.5 टक्क्यांवरुन 12.5 टक्के करण्यात आले आहे. तर कांदा निर्यात बंदीमुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटांना सामोरं जावं लागलं. आयात-निर्यात धोरणाच्या अभावामुळे महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राचा सर्वनाश करण्यास सरकार कारणीभूत ठरलं.
- महाराष्ट्रातील कांद्याऐवजी गुजरातमधील पांढ-या कांद्याच्या निर्यातीस प्राधान्य देण्याचं काम महायुती सरकारने केलेलं आहे. सरकारकडून मार्च 2024 मध्ये 5 लाख टन कांदा खरेदी करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले होते परंतु प्रत्यक्षात 4 महिने उलटून गेले तरीही कांदा अद्याप तसाच बाजारपेठा आणि गोदामांमध्ये पडून आहे.
- 7 डिसेंबर 2023 कांद्यावर निर्यातबंदी लागू केली. त्यावेळेस असं सांगण्यात आलं होतं की ही निर्यातबंदी 31 मार्च 2024 पर्यंत असेल. त्यानंतर खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचं वाटोळं व्हायला सुरुवात झाली. निर्यातबंदी ज्या दिवशी लागू झाली त्यादिवशी प्रतीक्विंटल 3000 ते 4000 रुपये भाव होता, पण त्याच्या दुसऱ्याच दिवशी हे भाव 2000 रुपये प्रतिक्विंटल एवढे झाले.
- संत्र्यासाठी निर्यात सबसिडी मिळावी अशा मागणीचे आंदोलन संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी केले, परंतु महायुती सरकारने अजब निर्णय घेत, फक्त निर्यातदार व्यापारी आणि शेतकरी उत्पाद कंपन्यांना सबसिडी देण्याचा निर्णय घेतला. यामुळे उत्पादक शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

- सरकारने तुरीवरचे आयात शुल्क 31 मार्च 2024 पर्यंत माफ करून आफ्रिका आणि म्यानमार मधील शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले आहे, पण त्याची किंमत महाराष्ट्र आणि कर्नाटक मधील शेतकऱ्यांना चुकवावी लागत आहे.

## बोगस बियाणाचा प्रश्न

- मराठवाड्यासह राज्यभरात बोगस बियाणांच्या आतापर्यंत 1 हजार 85 तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. राज्याचा कृषी विभाग या घटनांना आळा घालण्यात अपयशी ठरत आहे. आलेल्या तक्रारींत बहुतांश तक्रारी कापूस आणि सोयाबीन बियाणांच्या आहेत.

## बळीराजाची आत्महत्या

### अपुऱ्या मदतीमुळे शेतकरी आत्महत्यांमध्ये महाराष्ट्र भारतात अव्वल

- भारतात शेतकरी आत्महत्यांमध्ये महाराष्ट्राचा पहिला क्रमांक लागतो. 2023 मध्ये 2,851 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. लोकसभा निवडणुकीच्या काळात महाराष्ट्रात तब्बल 188 शेतक-यांनी आत्महत्या केल्या. महायुती सरकारने सातत्याने केवळ घोषणा करण्याचं काम केलं.
- महाराष्ट्राला नंबर एक करून दाखवू म्हणणा-या महायुती सरकारने शेतकरी आत्महत्यांमध्ये महाराष्ट्राला नंबर 1 करण्याची गॅरेंटी दिलेली आहे. वाढत्या आत्महत्येचे प्रमाण रोखण्यास आणि शेतकऱ्यांना तारण्यास सरकार पूर्णपणे अपयशी ठरले आहे.
- आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना अनुदान देण्यास निर्बंध - 2024-25 साठी शेतकरी आत्महत्यांचा अंदाज बांधणे शक्य नसल्याचे कारण देत महायुती सरकारने आत्महत्या ग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदत नाकारून असंवेदनशीलतेचा कळस गाठला आहे.
- कांद्याला अपेक्षित दर नाही, उसाची एफआरपी एकरकमी मिळत नाही, इतरही शेतमालाचे दर गडगडलेले आहेत. दुष्काळ जाहीर होऊनही शेतकऱ्यांना अर्थसहाय्य मिळालेले नाही. अडीच वर्षात 5083 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. गतवर्षीचा कापूस, भुईमूग, तूर, कांदा व मूग या पिकांचा विमा देखील मिळालेला नाही. अशा चिंताजनक स्थितीचा वारंवार सामना करताना 2020 व 2021च्या तुलनेत 2022 आणि 2023 राज्यातील शेतकरी आत्महत्या वाढल्या असून **दररोज आठ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्याचे** मदत व पुनर्वसन विभागाकडील माहितीवरून समोर आले आहे.
- तर 2024 या वर्षी जानेवारी ते जून या सहा महिन्याच्या कालावधीत विदर्भातील 1470 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे.

## संत्रा आणि कापसाला हमीभाव

### संत्रा उत्पादक आणि कपाशी उत्पादक शेतक-यांच्या मेहनतीची थट्टा

- गेल्या वर्षी विदभर्भातील एका शेतकऱ्याने दहा लाख रुपये किमतीची संत्री फक्त अडीच लाख रुपयांमध्ये विकली. ही दाहकता एका शेतकऱ्याची नसून विदर्भातील अनेक संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची आहे. ऊसाच्या धर्तीवर संत्र्यासाठी एफआरपी किंवा हमीभावाचा पर्याय देण्याच्या मागणीकडे महायुती सरकारकडून दुर्लक्ष करण्यात आलं. शासनाने मोठा गाजावाजा करुन कापसासाठी हमीभाव जाहीर केले. यानंतर कापूस खरेदीच्या बाता केल्या. परंतु कुठल्याही कापूस उत्पादकास हमीभावाएवढा दर म्हणजेच 7020 रुपये मिळालेला नाही.
- दोन वर्षांपासून हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील संत्र्यांचे मृग नक्षत्रातील पाऊस न पडणे आणि काढणीच्या वेळी होणाऱ्या अवकाळी पावसाने नुकसान होतेय. यामुळे अगोदरच त्रस्त असणाऱ्या शेतकऱ्यांना महायुती सरकारच्या अकार्यक्षमतेमुळे दोन वर्षापासुन अनुदान देखील वेळेवर मिळत नसल्याने संत्रा उत्पादक संकटात आले आहेत.

## सोयाबीनला मिळेना योग्य हमीभाव

- महाविकास आघाडी सरकारच्या काळात 10,000 पर्यंत गेलेला सोयबीनचा हमीभाव महायुती सरकारच्या काळात 4,500 पर्यंत खाली आला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षात असताना 2013 साली 6,000 हमीभाव मिळावा यासाठी आंदोलन केले होते. आता त्यांनाच त्या आंदोलनातील मागण्यांचा विसर पडलेला दिसून येतो.

| दराचा आलेख | |
|---|---|
| हंगाम | दर (रु. प्रतिक्विंटल) |
| ऑक्टोबर 2019 | 4000 |
| ऑगस्ट 2020 | 10300 |
| मार्च 2021 | 7500 |
| ऑगस्ट 2021 | 6400 |
| सध्या | 4500 |

## कापूस खरेदीत महाराष्ट्रावर अन्याय

- कापूस खरेदीत 'सीसीआय'ने तेलंगणात आघाडी घेतली असून, महाराष्ट्रासह इतर राज्यांत पिछाडीवर आहे. सीसीआयने 1 ऑक्टोबर 2023 ते 7 जानेवारी 2024 या काळात देशभरात एकूण 19 लाख 65 हजार गाठी कापसाची खरेदी केली. सीसीआयने एकट्या तेलंगणात 15 लाख गाठी कापसाची खरेदी केली असून, उर्वरित कापूस उत्पादक राज्यांमध्ये केवळ 4 लाख 65 हजार गाठी कापूस खरेदी करण्यात आला. महाराष्ट्रात केवळ 70 हजार गाठी कापसाची खरेदी करण्यात आली.
- वर्धा जिल्ह्यातील रोठा येथील शेतकरी अमोल ठाकरे अधिक भाव मिळणार या आशेने उमरी येथील सीसीआयच्या केंद्रावर गेले. रक्ताचे पाणी करूनही कापसाला भाव मिळत नाही म्हणून पोटच्या लेकराप्रमाणे जपून वाढविलेला, पिकविलेला कापूस क्षणात त्यांनी गाडीसह पेटवून दिला.

## दुग्ध व्यवसाय संकटात

### सबसिडीच्या नावाने बोंब, अनुदानाच्या नावाखाली दूध उत्पादक शेतक-यांच्या तोंडाला पाने.

- दूधाला 5 रुपये अनुदान देण्यात आले. प्रति लीटर 30 रुपयांचा दर देऊन दूध उत्पादक शेतक-यांची फसवणूक करण्याचा केविलवाणा प्रयत्न सरकारने केलेला आहे. शेतक-यांच्या प्रति लीटर 40 रुपये देण्याच्या मागणीला सरकारने केराची टोपली दाखवली. महाराष्ट्रात सुरु झालेल्या राज्यातील महानंद डेअरीसारख्या प्रमुख कंपन्यांचे व्यवस्थापन हे गुजरातमधील नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनकडे सोपवण्यात आल्याने दुग्ध उद्योगासाठी आर्थिक संकटाची मोठी दरी निर्माण करण्याचं काम सरकारने केलं आहे. पिण्याच्या पाण्याची बाटली 20 रुपयांना आणि एक लिटर दुधाचा भाव 25 रुपये आहे. एकप्रकारे दूध उत्पादक शेतक-यांवर घोर अन्याय महायुती सरकारकडून करण्यात आला.

## फसवी पीक विमा योजना

### दावे नाकारल्यामुळे आणि कमी भरपाई देण्यात आल्यामुळे शेतक-यांचे नुकसान

- 2023 ते 2024 पर्यंत प्रधानमंत्री शेतकरी पीक विमा योजनेंतर्गतचे कव्हरेज हे 4.17 टक्क्यांनी कमी झाले. 1 रुपयात पीक विमा देण्याचे आश्वासन दिले असताना नैसर्गिक आपत्तींचे कारण देत शेतकऱ्यांना विम्यापासून वंचित ठेवण्यात आले. यातून फायदा शेतकऱ्यांचा नव्हे तर, केवळ पीकविमा कंपन्यांचाच झाला. 2018 मध्ये, खरीप पिकांसाठी केवळ 7% पीक विम्याचे दावे निकाली गेले, यातून सरकारचं बळीराजाविरोधी धोरण स्पष्ट होतं.

- सोलापूर जिल्ह्यातील 7,01,640 शेतकऱ्यांनी खरीप हंगामात विमा उतरविला. विमा कंपनीला राज्याकडून 188.41 कोटी तर केंद्राकडून 132.81 कोटीचा हिस्सा मिळाला. दुसरीकडे शेतकऱ्यांचा प्रत्येकी 1 रुपया, असे एकूण 321.29 कोटी रुपये विमा कंपनीला मिळाले. त्यापैकी अवघे 105 कोटी रुपये जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळाले.

## शेती उपयोगी साहित्याच्या किमतीत वाढ

- खतांच्या निर्मितीमध्ये वापरल्या जाणाऱ्या निविदा, कच्च्या मालावर 18 टक्के दराने 'जीएसटी' लावल्याने खतांचे दर वाढले असून त्याचा भार शेतकऱ्यांवर पडत आहे.
- युरिया, डीएपी या मुख्य अन्नद्रव्यांना पाच टक्के, दुय्यम आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांना 12 टक्के, तर कीडनाशकांवर 18 टक्के 'जीएसटी' आकारला जातो.
- ट्रॅक्टर आणि त्याच्या उपकरणांवर 6 टक्के मूल्यवर्धित कर (व्हॅट) आकारला जात होता. आता 'जीएसटी'मध्ये 12 ते 18 टक्के कर आहे. त्यामुळे शेतीसाठीची उपकरणे महागली आहेत.
- सूक्ष्म सिंचन संचांवर 18 टक्के 'जीएसटी' लावल्याने ठिबक आणि तुषार सिंचनावरील खर्चात मोठी वाढ झाली आहे. पूर्वी सूक्ष्म सिंचनावर 6 टक्के मूल्यवर्धित कर (व्हॅट) होता. त्यामुळे विक्रीतही 20 ते 30 टक्के घट झाली आहे. यामुळे जणू शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान वापरूच नये असा या सरकारचा मानस दिसतोय.
- शेतकरी आत्महत्या हा काही नवीन मुद्दा नाहीये, असे असवेदनशील वक्तव्य तत्कालीन कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी केले होते. यातूनच महायुती सरकारला शेतकरी बंधावाप्रति किती संवेदना आहे ते दिसून येते.
- कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे येथे हमीभावापेक्षा कमी दर देत असल्यामुळे जाब विचारणाऱ्या शेतकऱ्याला व्यापाऱ्याने मारले, बाजार समितीच्या आवारात ही घृणास्पद घटना घडली. तरी देखील प्रशासनाने त्यावर काहीही कारवाई केली नाही.



# सामाजिक न्याय

## आदिवासी समाजाकडे दुर्लक्ष

### 1 कोटींहून अधिक आदिवासींचे वनहक्क हिरावून घेण्यात आले.

- 2006 चा वनहक्क कायदा अंमलात आणला गेला नाही, ज्यामुळे महाराष्ट्रात 1 कोटीहून अधिक आदिवासींना त्यांच्या हक्काच्या जमिनी नाहीत. पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्पांच्या नावाखाली आदिवासींचे जबरदस्तीने स्थलांतर केले जात आहे, प्रकल्पग्रस्त व्यक्तींसाठी केवळ तात्पुरती निवाऱ्याची व्यवस्था केली जात आहे. आदिवासी विकास विभागात 6 हजार कोटी रुपयांचा घोटाळा करणारे विजयकुमार गावित यांना पुन्हा एकदा भाजपने आदिवासी विकास विभागाच्या मंत्री पदाची धुरा दिलेली आहे.
- आदिवासी विकास विभागाच्या राज्यात 499 शासकीय आश्रम शाळा आहेत. त्यात अनुसूचित जमातीचे 1 लाख 97 हजार 780 विद्यार्थी शिक्षण घेतात. राज्य शासनानं सन 2023-24 या शैक्षणिक वर्षापासून आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रम शाळामधील विद्यार्थ्यांना डीबीटीतून गणवेश, नाईट ड्रेस, शालेय साहित्य आदी सहा वस्तू वगळून त्या विभागाकडून पुरवण्याचा निर्णय घेतला होता. परंतु आवश्यक 150 कोटींच्या निधी खर्चाला प्रशासकीय मान्यता मिळाल्यामुळे आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांपासून वंचित राहावे लागत आहे.
- राज्यात पालघरमध्ये आणि पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथे आदिवासी बांधवांवर लाठीचार्ज करणारं महायुती सरकारच होतं.

## आदिवासी बहुल भागातील पेसा भरती बारा वर्षांपासून प्रलंबित

- राज्यातील ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, नांदेड, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली आणि चंद्रपूर या आदिवासीबहुल 13 जिल्ह्यात आदिवासी बेरोजगार उमेदवारांची भरतीच झाली नसल्यामुळे आदिवासी बांधवांच्या पदरात निराशा पडली आहे.

- पेसा क्षेत्रातील 17 संवर्गामधील 12,500 आदिवासी उमेदवारांच्या भरतीचा विषय गंभीर होत चालला असताना, राज्य सरकारकडून आश्वासनाची खैरात दिली जात आहे. पण भरती प्रक्रिया काय घेतली जात नाहीये.

## ग्रामसभेच्या हक्कावर गदा आणि आदिवासी बांधवांचे आंदोलन

- आदिवासीबहुल भागात नवीन प्रकल्प मंजुरीतून ग्रामसभेचे अधिकार काढून घेतल्याने गडचिरोली, गोंदियातील आदिवासी बांधवांनी आंदोलन केले आहेत. जंगल तोडून विकास नको अशी आग्रही भूमिका आदिवासींनी घेतली आहे. फडणवीस मुख्यमंत्री असतांना 2019 साली सर्वाधिक वनक्षेत्र (4948 हेक्टर) खाणकामासाठी देण्यात आल्याचे दिसून आले आहे.

## आंतरजातीय विवाहांना देण्यात येणारे अनुदान प्रलंबित

- जाती-जातीतील भेद मिटवून आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाकडून जोडप्यांना 50 हजारांचे अनुदान देण्यात येते. मात्र नगर जिल्ह्यात गेल्या दोन वर्षांपासून 320 लाभार्थ्यांना या प्रोत्साहनपर अनुदानाची प्रतीक्षा आहे. यातून हे सरकार सामाजिक न्यायाच्या बाबतीत किती गंभीर आहे ते तर दिसतेच, पण अशा कृतीतून त्यांचे प्रतिगामी विचार देखील अधोरेखित होतात.

## आरक्षणाच्या नावाखाली राजकीय पोळी

### सरकारकडून वेळकाढूपणा

- आरक्षण देतो देतो म्हणत सरकारने वेळकाढूपणा केला. दोन समाजांची दिशाभूल करण्याचं काम करत आरक्षणाच्या नावावरून फक्त चर्चा केली. परंतु जनतेला केवळ चर्चा नाही तर न्याय हवा होता. जो सरकारने दिला नाही. आरक्षणाचा मुद्दा केंद्राचा असतानाही केंद्राने तो सोडवण्यास टाळाटाळ केली. आरक्षणाचा मुद्दा झुलवत ठेवण्याचं काम सरकारने करून कुठलाही तोडगा काढलेला नाही.
- आरक्षणाची मागणी करणाऱ्या आंदोलकांत फुट पाडण्यासाठी आणि दोन समाज एकमेकांच्या समोर उभे राहून तेढ निर्माण व्हावे, यासाठी सत्ताधारी महायुती कारस्थाने करतांना दिसत आहेत.

## समाजकल्याण विभागात 55% पदे रिक्त

- समाजकल्याण विभागात एकूण मंजूर 6,730 पदांपैकी 3,646 पदे रिक्त असून त्यामुळे विभागाच्या कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम होत असल्याचे निरक्षण मुंबई उच्चन्यायालयाने नोंदले आहे. एकंदरीत महायुती सरकारला वंचित समुदयाच्या हितसंबंधाशी काहीही देणेघेणे राहिले नाहीये हे अधोरेखित होते।

## मंत्रालय आत्महत्या

### फडणवीस सरकारच्या काळात बसवण्यात आल्या जाळ्या, मंत्रालयात आत्महत्येचे प्रकार थांबवण्यात महायुती सरकारही अपयशी

- भाजप सरकारच्या राजवटीत 2014 ते 2019 या कालावधीत मंत्रालयात आत्महत्यांचे सत्र सुरु झाले. परिणामी सुरक्षा जाळ्या बसवण्यात आल्या, हे एकप्रकारे तत्कालीन फडणवीस सरकारचं अपयशच आहे. परंतु महायुती सरकारच्या राजवटीत पुन्हा मंत्रालयात आत्महत्यांचे सत्र सुरु झाले. उदा-
    - 22 जानेवारी 2018 - धुळे जिल्यातील औष्णिक वीजप्रकल्पात जमीन गेलेले शेतकरी धर्मा पाटील यांची विषप्राशन करून आत्महत्या.
    - 18 सप्टेंबर 2019 - दिव्यांग विद्यार्थ्यांच्या विनाअनुदानित शाळांसाठी निधीची मागणी करणाऱ्या दोन शिक्षकांनी उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न केला.
    - 17 नोव्हेंबर 2022 - युवकाचा उडी मारुन आत्महत्येचा प्रयत्न
    - 28 मार्च 2023 - मंत्रालयासमोर विष प्राशन केलेल्या धुळ्यातील महिलेचा मृत्यू
    - 29 ऑगस्ट 2023 मागण्या पूर्ण न झाल्याने शेतकऱ्यांकडून आत्महत्येचा प्रयत्न
    - 26 सप्टेंबर 2023- शिक्षक भरती रखडल्याने आत्महत्येचा प्रयत्न
    - 8 मार्च 2024 - वडापाव विक्रेत्याकडून उडी मारुन आत्महत्येचा प्रयत्न
    - 6 जून 2024 - युवकाची मंत्रालयात उडी मारुन आत्महत्येचा प्रयत्न
    - 9 जुलै 2024- कामं होत नाहीत म्हणून पाचव्या मजल्यावरुन आत्महत्येचा प्रयत्न

हक्क मागतोय महाराष्ट्र



# युवा

## बेरोजगारीचे संकट

### 31 लाख तरुण बेरोजगार, भत्ता योजना अयशस्वी

- महाराष्ट्र बेरोजगारीच्या गंभीर संकटाचा सामना करत आहे. 30 वर्षाखालील 31 लाख युवा वर्ग हा बेरोजगार आहे. मुख्यमंत्री युवा कार्य शिक्षण योजनेच्या नावाखाली 10 लाख बेरोजगार तरुणांची फसवणूक. पात्र लाभार्थीही 10 हजार रुपयांच्या मासिक भत्त्यापासून वंचितच आहेत.

### महाराष्ट्रात वाढलाय बेरोजगरीचा आकडा - 62,07,266 बेरोजगारांची शासन दरबारी नोंद

- राज्याच्या रोजगार आणि उद्योजकता विभागाकडील नोंदीनुसार, राज्यातील नोंदीत बेरोजगार युवकांची संख्या 62 लाख झाली आहे.
- जिल्हानिहाय नोंदणीकृत बेरोजगार युवांची संख्या -
    - मुंबई – 3 लाख 86 हजार 167
    - ठाणे – 3  लाख 72 हजार 61
    - पुणे - 4 लाख 72 हजार 40
    - छत्रपती संभाजीनगर – 2 लाख 93 हजार 265
    - नागपुर – 2 लाख 97 हजार 171
    - कोल्हापूर – 2 लाख 73 हजार 367



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार

## नमो महारोजगार मेळाव्याचा पर्दाफाश

### रोजगार देण्याच्या नावाखाली बेरोजगारांची फसवणूक.

- बहुचर्चित नमो महारोजगार मेळाव्यात जाहीर करण्यात आलेल्या 43,000 रिक्त पदांपैकी तब्बल 30,000 रोजगार हे कायमस्वरूपी नव्हे तर प्रशिक्षणार्थी म्हणून होते. 15 टक्क्यांपेक्षाही कमी प्रमाणातील बेरोजगारांना नोकरी मिळवता आली. सरकार हे रोजगार निर्माण करण्यात सातत्याने अयशस्वी ठरत आहे तरीदेखील नमो महारोजगार मेळाव्याच्या एका कार्यक्रमासाठी तब्बल 5 कोटी रुपयांचा खर्च शासनाकडून केला जात आहे.

## रिक्त सरकारी पदे

### मोठ्या प्रमाणावर अर्ज आले असतानाही 2.5 लाख जागा रिक्तच.

- 2022 मध्ये महाराष्ट्रात 2.5 लाख सरकारी नोकऱ्या रिक्त असल्याचे आर्थिक पाहणी अहवालातून समोर आले आणि त्यानंतर कोणताही नवीन माहिती जाहीर करण्यात आलेली नाही. गेल्या वर्षी 2023 मध्ये राज्यातील विविध विभाग आणि जिल्हा परिषद अंतर्गत 2.44 लाखांपेक्षा अधिक पदे रिक्त असल्याचे उघड झाले 2024 मध्ये महाराष्ट्र पोलीस भरतीसाठी 17,471 पदांसाठी 17.76 लाख अर्ज आले. त्यापूर्वी देखील 13 लाख उमेदवारांनी पोलिस भरतीसाठी अर्ज केले होते. इतकी ही बेरोजगारीची भीषण वास्तवता.

### MPSC चा ढिसाळ कारभार आणि बेरोजगारांचे हाल

- MPSC ने 2024 साठीच्या वर्ग 2 आणि वर्ग 3 च्या पदांची जाहिरात सप्टेंबर महिना संपलाय तरी काढेलली नाहीये, कारण राज्य सरकारने अद्याप परिपूर्ण मागणीपत्र राज्य लोकसेवा आयोगाला दिले नाहीये.
- राज्य लोकसेवा आयोगाच्या जवळपास सर्व भरती प्रकिया न्यायालयात अडकत असल्याने, जाहिरात येऊन नियुक्ती होण्यासाठी जवळपास अडीच ते तीन वर्षे लागत आहेत. जसे की 2022 च्या राज्यसेवा परीक्षेत यशस्वी झालेल्यांना सप्टेंबर 2024 मध्ये देखील नियुक्ती मिळाली नाहीये.
- पीएसआय भरती प्रक्रियेला पूर्ण होण्यासाठी तर 3 ते 4 वर्षांचा कालावधी MPSC घेताना दिसत आहे, त्यामुळे सरकारी नोकरीसाठी तयारी करणाऱ्या युवांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे.
- रखडलेल्या भरती प्रक्रिया, रिक्त पदे भरण्याबाबत सरकारची असलेली अनास्था यामुळे शासकीय नौकरीसाठी तयारी करणाऱ्या, विद्यार्थ्यात आत्महत्या करण्याचे प्रमाण देखील वाढले आहे.

# युवा धोरणाकडे महायुती सरकारचे दुर्लक्ष, राजकीय सुडापोटी युवांच्या भविष्याशी खेळ

- 18 ते 35 वयोगटांतील युवकांचा विकास प्रक्रियेत सहभाग वाढविण्यासाठी राष्ट्रीय युवा धोरणाच्या धर्तीवर महाराष्ट्राने 14 जून 2012 रोजी स्वतंत्र युवा धोरण जाहीर केले. त्यात एकंदर 20 महत्त्वपूर्ण शिफारशी करण्यात आल्या होत्या. त्यापैकी केवळ सहा शिफारशींबाबत आतापर्यंत शासन निर्णय निर्गमित केले गेले. परंतु, त्यांची देखील अद्याप अंमलबजावणी झालेली नाहीये.
- 2012 मध्ये हे धोरण आणणारे सरकार 2014 मध्ये पायउतार झाले. 2014 मध्ये सत्तेत आलेल्या भाजप सरकारने केवळ राजकीय आकसाने, राज्यात वाढलेली गुन्हेगारी, बेरोजगारी अशा अनेक मुद्द्यांवर प्रभावी उत्तरे असलेले हे धोरण अमलात आणले नाही.

## सर्वसामान्य प्रवासी वाहतूक कामगारांचा संघर्ष

### असंघटित कामगारांच्या न्याय व हक्कांवर गदा.

- ओला ड्रायव्हर्स किंवा झोमॅटो डिलिव्हरी अशा असंघटित क्षेत्रातील कामगारांना सरकारकडून कुठल्याही प्रकारचे संरक्षण नाही. त्यांच्यासाठी कुठलीही विमा किंवा पेन्शन योजना नाही, ज्यामुळे लाखो सर्वसामान्य प्रवासी वाहतूक करणा-या कामगारांच्या नोकरीत स्थिरता किंवा फायदे नाहीत. त्यांना इच्छेनुसार कामावर ठेवले जाते आणि त्यांना कामावरुन काढून टाकले जाते, ही एकप्रकारे कामगारांच्या हक्कांवर आणलेली गदाच आहे.

## अग्निपथ योजना फसली

### 24 व्या वर्षी निवृत्त होणारे अग्नीवीर सैनिक निवृत्ती आणि लाभापासून वंचितच.

- अग्निपथ योजनेनुसार 75% अग्निवीरांना चार वर्षांच्या सेवेनंतर सक्तीने सेवानिवृत्त केले जाते. अवघ्या 24 व्या वर्षी सेवानिवृत्त करणारी ही पहिली नोकरी आहे. पेन्शन किंवा कुठलेही अन्य लाभ नाहीत. इतकेच नव्हे तर कर्तव्य बजावताना अग्नीवीर शहीद झाल्यास त्यांचे शासकीय इतमामात अंत्यसंस्कारही केले जात नाहीत. युवकांना देशसेवेच्या माध्यमातून सैन्यदल एक योग्य करीअर होते, परंतु पेन्शन आणि इतर लाभ न देणारी आणि अवघ्या काही काळापुरतीच नोकरीची संधी देणारी सरकारची अग्निपथ ही एक फसवी योजना आहे.




# गुन्हेगारी

## वाढती गुन्हेगारी

### गुन्हेगारीत महाराष्ट्र नंबर 1 वर, दोषी ठरवण्याचा दरही घसरला...

- केंद्र सरकारच्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात गुन्ह्यांचे प्रमाण सर्वाधिक असून देशात महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. गुन्हेगारीत दोषी ठरवण्याचे प्रमाण हे 2020 मध्ये 58.29% इतके होते. ते 2023 मध्ये 41.36 टक्क्यांवर घसरले आहे. सरकार गुन्हेगारांवर कारवाई करण्यात आणि त्यांच्यावर खटला चालवण्यात पूर्णपणे अपयशी ठरत आहे.

## बालकांविरोधातील गुन्हेगारीत वाढ

### महाराष्ट्र सरकार बालकांचे रक्षण करण्यात पूर्णपणे अपयशी ठरलेलं आहे.

- महाराष्ट्रातील बालकांविरोधातील गुन्ह्यांची संख्या 2014 मध्ये 8,115 होती. 2023 मध्ये ती तब्बल 21,802 वर पोहोचली आहे. दर तासाला बालकांविरोधात दोन गंभीर गुन्हे घडतात. राज्यातील बालकांची सुरक्षा राखण्यात महायुती सरकार अपयशी ठरलं.

## हिट-अँड-रन प्रकरणात वाढ

### मद्यधुंद वाहनचालकांमुळे पादचारी आणि वाहनचालकांची सुरक्षा धोक्यात.

- हिट अँड रन प्रकरणांमुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. पुणे कल्याणीनगर पोर्शे घटना, वरळीतील मिहिर शाह बीएमडब्ल्यू प्रकरण यासारखी अनेक हाय-प्रोफाईल प्रकरणे आहेत.

ज्यामध्ये आरोपी व त्यांच्या कुटुंबियांना वाचवण्यासाठी सरकारकडून कसोशीने प्रयत्न करण्यात येत आहेत.

- रविवारी दि. 08 सप्टेंबर मध्यरात्री भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा मुलगा संकेत बावनकुळे आणि त्याचे दोन मित्र अर्जून जितेंद्र हावरे (24) आणि रोनित चिंतमवार (27) धरमपेठमधील लाहोरी हॉटेलमध्ये गेले होते. मध्यरात्री साडेबाराला ते ऑडी मोटारीतून बाहेर पडले. सेंट्रल बाजार रोडवरुन भरधाव जात असताना सेंटर पॉईंट हॉटेलसमोर त्यांनी जीतू सोनकांबळे याच्या मोटारीसह तीन वाहनांना धडक दिली.

## न्याय मिळवणे झाले अवघड

- जनतेला न्याय किती सुलभपणे मिळतो, याचा आढावा घेणाऱ्या इंडिया जस्टिस रिपोर्ट नुसार महाविकास आघाडी सरकारच्या काळात 2021 मध्ये महाराष्ट्र अव्वल क्रमांकाचे राज्य होते. पण महायुती सरकारच्या काळात 2023 मध्ये महाराष्ट्र अकराव्या स्थानावर घसरले आहे.

**भारत न्याय प्रक्रिया अहवाल**

| | राज्य | 10 पैकी गुण |
|---|---|---|
| 1. | कर्नाटक | 6.38 |
| 2. | तामिळनाडू | 6.11 |
| 3. | तेलंगणा | 6.11 |
| 4. | गुजरात | 5.60 |
| 5. | आंध्र प्रदेश | 5.41 |
| 6. | केरळ | 5.36 |
| 7. | झारखंड | 5.26 |
| 8. | मध्य प्रदेश | 5.25 |
| 9. | छत्तीसगड | 5.20 |
| 10. | ओडिशा | 5.16 |
| 11. | महाराष्ट्र | 5.16 |
| 12. | पंजाब | 5.10 |
| 13. | हरियाणा | 4.79 |
| 14. | उत्तराखंड | 4.46 |
| 15. | राजस्थान | 4.36 |
| 16. | बिहार | 4.32 |
| 17. | पश्चिम बंगाल | 3.88 |
| 18. | उत्तर प्रदेश | 3.78 |




## मराठी अस्मिता धोक्यात

### मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी कुठलेच प्रयत्न नाहीत.

- मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी 2012 मध्ये समिती स्थापन करूनही केंद्रात भाजप सरकार सत्तेत आल्यानंतर कोणतीही कार्यवाही झाली नाही. मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याची घोषणा म्हणजे महायुती सरकारसाठी केवळ एक निवडणूक जुमला आहे.

## मराठी माध्यमाच्या शाळांसामोर अस्तित्वाचा प्रश्न

- राज्य शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये पुढील शैक्षणिक वर्षापासून सीबीएससीच्या धर्तीवर अभ्यासक्रम राबवण्याची घोषणा शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी नुकतीच केली आहे. यामुळे मराठी माध्यमांच्या शाळेसमोर आव्हान निर्माण होणार असून, शिक्षणातील प्रादेशिक विविधता नष्ट होण्याची भीती आहे.
- दत्तक शाळा योजना घोषित करणे, 20 पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करणे, यासारखे निर्णय घेण्याचा प्रयत्न करून महायुती सरकारने मराठी शाळांच्या मुळावर उठण्याचा प्रयत्न सत्तेत आल्यापासून अविरत चालू ठेवला आहे.

## ऐतिहासिक वारशांची दुरावस्था

### किल्ला आणि स्मारकांच्या पुर्नविकासाकडे दुर्लक्ष

- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 2022 मध्ये किल्ले आणि स्मारकांच्या जीर्णोद्धारासाठी विशेष प्राधिकरणाची निर्मिती केली होती. परंतु ती केवळ घोषणा राहून याबाबत कुठलीच ठोस पावलं उचलण्यात आली नाहीत. छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा साम्राज्याचा वारसा आजही दुर्लक्षित आणि असुरक्षित आहे.

### छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा उभारण्यात देखील भ्रष्टाचार

- सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणमधील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेला, छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा आठ महिन्यात कोसळला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 4 डिसेंबर 2023 रोजी मालवणमध्ये नौदल दिनानिमित्त येऊन शिवरायांच्या पुतळ्याचे लोकार्पण केलं होते. तो पुतळा अवघ्या आठ महिन्यात 26 ऑगस्ट 2024 रोजी कोसळला.
- कोणतेही मोठे काम केले नसतांना, फक्त सत्ताधारी पक्षाच्या मर्जीतील असणाऱ्या जयदीप आपटेला या पुतळ्याच्या निर्मितीचे काम देण्यात आले होते. फक्त अडीच वर्षांचा शिल्पकलेचा अनुभव आणि आतापर्यंत फक्त दोन फुट उंचीची मूर्ती बनवलेल्या आपटेंना हे कंत्राट मिळाले होते. त्यामुळे एकंदरीत या प्रक्रियेत प्रचंड भ्रष्टाचार झाल्याचे दिसून येते.

## उपेक्षित मराठी चित्रपटसृष्टी

### प्रदर्शन नियमांची अंमलबजावणी करण्यात सरकार अपयशी.

- महाराष्ट्रात चित्रपटगृहांमध्ये मराठी चित्रपट प्रदर्शित करण्याचे प्रमाण हे इतर भाषेतील चित्रपट प्रदर्शनांच्या तुलनेत खूपच कमी आहे. मराठी चित्रपटांसाठी नियमावली या अधिक जाचक करण्यात आल्या आहेत. मराठी चित्रपटांना अधिकचे शो मिळत नाहीत ही लाजीरवाणी बाब आहे.

## लोककलावंतांकडे दुर्लक्ष

### लोककलावंतांसाठी असणारी पेन्शन योजना रखडली, नव्या कलाकारांना पाठबळ नाही

- 1954 मध्ये सुरु करण्यात आलेल्या वृद्ध आणि सेवानिवृत्त लोककलाकारांसाठी असणारी पेन्शन योजनेत महायुतीच्या काळात कोणतीही सुधारणा करण्यात आलेली नाही. इतकेच नव्हे तर निवृत्तीवेतनही महायुती सरकारच्या राजवटीत वितरित केले गेले नाही. याव्यतिरिक्त कलाक्षेत्रातील नव्याने काही प्रयोग करणाऱ्या कलाकारांकरीता आणि कलाक्षेत्रासाठी अतुलनीय योगदान देणाऱ्या नव्या कलाकारांकडे सरकारने पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे.

## कला संस्था बंद होण्याच्या मार्गावर

### नाट्यगृह, सांस्कृतिक केंद्रे आणि ग्रंथालये बंद होण्याच्या मार्गावर...

- गेल्या 10 वर्षात नाट्यगृहे, सांस्कृतिक केंद्रे आणि 700 हून अधिक सार्वजनिक ग्रंथालये बंद पडल्याने महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा धोक्यात आला आहे. राज्यभरातील सांस्कृतिक संस्थांचे संवर्धन करण्यासाठी सरकारने कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत.

## महापुरुषांचा अवमान

### जनतेच्या भावना दुखवण्याचं महायुतीचं काम

- माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, महायुती सरकारमधील मंत्री मंगलप्रभात लोढा, मंत्री चंद्रकांत पाटील, आ. प्रसाद लाड, खा. श्रीकांत शिंदे, आ. गोपीचंद पडळकर यांच्याकडून छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीमाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महाराष्ट्रातील महापुरुषांचा आणि माताभगिनींचा अवमान करण्याचं काम झालं.

## मराठी माणसाची गळचेपी

### मराठी माणसाला घरं नाकारली, नोक-याही नाहीत.

- महाराष्ट्रात मराठी माणसावरच इतर भाषिकांकडून अन्याय सुरु आहे. मराठी माणसाला इतर भाषिकांकडून इमारतींमध्ये घरे घेण्यास विरोध करण्यात आला. गुजरातच्या मुंबईतील कंपनीत काम

करण्यासाठी मराठी युवकांना मज्जाव करण्यात आला. मुंबईच्या वर्सोवा-वांद्रे येथील सीलिंकच्या कामाच्या मुलाखती या चेन्नईत झाल्या. महाराष्ट्रात राहणा-या मराठी माणसाचीच गळचेपी करण्याचं काम महायुती सरकारने केलेलं आहे.

## वारीविरोधी सरकार

### लाठीचार्ज आणि वारकऱ्यांची दिशाभूल

- आळंदीत वारकऱ्यांवर विनाकारण लाठीचार्ज करण्याचे आदेश तत्कालीन गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. प्रति दिंडी 20 हजार रुपये देण्याची घोषणा करुन वारक-यांची दिशाभूल करण्याचं काम महायुती सरकारने केलेलं आहे.




# दळणवळण

## एसटी प्रवासाची दुरावस्था

### चांगल्या प्रतीच्या बस गाड्या खरेदी करण्यात MSRTC अयशस्वी, खासगीकरणाकडे वाटचाल

- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून (MSRTC) नवीन अद्ययावत बस खरेदी करण्यात येत नाहीत. परिणामी राज्यातील एसटी बस गाड्यांची अवस्था ही भंगारासमान झाली असून प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरं जावं लागत आहे. एसटी प्रशासनात मोठ्या प्रमाणावर खासगीकरण होत असल्याने सामान्य प्रवाशांच्या सुसज्ज प्रवासाकडे मात्र दुर्लक्ष होत आहे.

## वाहतूक कोंडीमुळे महाराष्ट्रातील शहरांची जागतिक पातळीवर दखल

- 'टॉमटॉम वाहतूक निर्देशांक 2023' जाहीर करण्यात आला. यात 6 खंडांतील जगभरातील 55 देशांतील 387 शहरांचा समावेश आहे. या शहरांतील वाहतूक कोंडीची पाहणी करून त्यांची क्रमवारी करण्यात आली आहे. यात सर्वाधिक वाहतूक कोंडी असणाऱ्या जगातील आघाडीच्या शहरांमध्ये पुण्याने सातवा क्रमांक मिळवला आहे.

## ट्रेन अपघातात वाढ, भाडेवाढीशी सामना

### रेल्वे प्रवास असुरक्षित आणि महाग

- 2023 मध्ये भारतात रेल्वे अपघातात 37% वाढ झाली आहे, तर 2013 ते 2022 पर्यंत रेल्वे भाड्यात 107 टक्क्यांनी वाढ झाली आहे. स्लीपर कोचमध्ये कपात करण्यात आली आहे, तर नॉन-एसी डब्यांच्या तिकीट दरात वाढ झाली आहे. सर्वसामान्य रेल्वे गाड्यांमध्ये आरक्षित असणा-या डब्यांमध्येही मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असून मोठ्या त्रासातून प्रवाशांना प्रवास करावा लागत आहे. वंदे भारतसारख्या अव्वाच्या सव्वा दर आकारणा-या एक्स्प्रेस गाड्यांमध्ये वाढ करण्यात आली आहे. परंतु सर्वसामान्यांसाठी असणा-या एक्स्प्रेस गाड्यांमधील दुरावस्था मात्र कायम आहे. आजच्या घडीला रेल्वे

प्रवास धोकादायक आणि महाग झाला आहे. प्लॅटफॉर्म तिकीटामध्येही 5 रुपयांची वाढ करून 10 रुपये करण्यात आले.

## रेल्वे स्थानकांचा विकास रखडलेलाच.

### अमृत भारत स्टेशन योजना अयशस्वी

- अमृत भारत स्थानक योजनेंतर्गत महाराष्ट्रातील 123 रेल्वे स्थानके अद्ययावत करायची होती, पण ही घोषणा हवेतच विरुन गेली. बहुतांश स्थानकांवर अजूनही पिण्याचे पाणी आणि स्वच्छतागृहे या मूलभूत सुविधांचा अभाव आहे.

## उडान योजना फसली

### विमानतळ विकास रखडला, ऑपरेशनल विमानतळांचा वापर कमी झाला

- 2019 मध्ये UDAAN योजनेत सहभागी होणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य होते. परंतु राज्यातील 9 पैकी फक्त 6 विमानतळच कार्यान्वित झाले आहेत. जळगाव, गोंदिया आणि सिंधुदुर्ग यांसारख्या विमानतळांवर अद्याप कमीत कमी विमान उड्डाणे होत आहेत. त्यामुळे या विमानतळांचा वापर नागरिकांसाठी होण्याऐवजी विमानतळांच्या देखभाल दुरुस्तीवरच सर्वाधिक पैसे खर्च होत आहेत.

## पायाभूत सुविधांच्या नावाखाली जनतेची फसवणूक

### मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचा खर्च वाढला, कामालाही विलंब

- महाराष्ट्रात 150 कोटी रुपयांपेक्षा अधिकच्या मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी तब्बल 66% प्रकल्पांना पूर्ण होण्यास विलंब होत आहे, परिणामी या प्रकल्पांवरील अतिरिक्त खर्च हा एकूण 20,000 कोटी रुपयांहून अधिक झाला आहे. मुंबई-नागपूर, मुंबई-पुणे, मुंबई-कोकण यासारखा शहरातील प्रवास हा वेगाने व्हावा यासाठी बुलेट ट्रेन नाही पण गुजरातमधील अहमदाबादला लवकर पोहचता यावे यासाठीच मुंबई- अहमदाबाद बुलेट ट्रेनचा आग्रह धरण्यात आला.

## निकृष्ट दर्जाच्या कामांची गॅरंटी.

### महायुतीकडून नागरिकांचा जीव धोक्यात घालण्याचं काम.

- मोठ्या थाटात महायुतीकडून घाईघाईने प्रसिध्दीसाठी अपूर्णावस्थेतील समृध्दी महामार्गाचे लोकार्पण करण्यात आले. डिसेंबर 2022 पासून ते 15 ऑक्टोबर 2023 पर्यंत तब्बल 1,282 अपघातात 135 प्रवाशांचा मृत्यू झाला. अवघ्या दोन वर्षातच महामार्गावर चिरा पडल्या असून, रस्त्याच्या मधूनच रॉड बाहेर आले असून समृध्दी महामार्गाची मोठी दुरावस्था झाली आहे. मोदींच्या हस्ते उद्घाटन झालेल्या अटल सेतूवरील रस्ता अवघ्या 5 महिन्यात खचला. कोस्टल रोडच्या उद्घाटनानंतर आठवड्याभरातच गळती लागली. यातून कोस्टल रोडच्या उभारणीत गलथान कारभार झाल्याचं स्पष्ट होतं. कोट्यवधी रुपये खर्च करून 2 वर्षांनंतर बांधण्यात आलेल्या मुंबईतील गोखले-बर्फीवाला पुलाची जोडणी फसल्याचे उघड झाले. कोकणात चिपळूण येथील बांधकामाधीन पूल कोसळल्याची घटना घडली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या घरापासून काही अंतरावर मेट्रोच्या कामातील लोखंडी सळ्या थेट वाहनात घुसून अपघात झाल्याची घटना घडली. मुंबई नाशिक महामार्गावरील खड्ड्यामुळे प्रवाशांना दररोज नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

## भाजपला इलेक्टोरल बॉण्ड देणाऱ्या कंपनीलाच महाराष्ट्रात कंत्राटं.

### भाजपला 966 कोटींची देणगी देणाऱ्या मेघा इंजीनिअरिंग कंपनीला मिळालेली महाराष्ट्रातील कामे.

- मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पात बीकेसी स्थानक उभारणी.
- एमएमआरडीएकडून उभारण्यात येणाऱ्या ठाणे-बोरीवली भुयारी मार्ग प्रकल्पाच्या दोन पॅकेजेसची तब्बल 12 हजार 57 कोटी रुपयांची कामे.
- सिडको पाणीपुरवठा योजनेच्या बोगद्याचे 1,030 कोटींचे कंत्राट.
- एमएमआरडीएच्या वर्सोवा-भाईंदर सागरी किनारा मार्ग प्रकल्पातील बोगद्यांची 6 हजार कोटींची कामे.
- मुंबई महापालिकेच्या पश्चिम उपनगरांतील 106 किलोमीटर लांबीच्या रस्त्यांच्या सिमेंट काँक्रिटीकरणाच्या कोट्यवधी रुपयांच्या कामाचे कंत्राट.

## रस्त्यांची झालीये चाळणी, महामार्ग होईनात पूर्ण

- अठरा हजार कोटी खर्चून तयार करण्यात आलेल्या अटल सेतूला जोडण्यासाठी बनवण्यात आलेल्या रस्त्यावर पाच महिन्यातच भेगा पडल्याचे दिसून आले. यामुळे कामाच्या गुणोत्तर प्रश्नचिन्ह निर्माण होतात. तसेच आर्थिक फायद्यासाठी महायुती सरकार काय करू शकते ते दिसून येते.

- देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत 100 कोटी खर्च करून बांधण्यात आलेल्या गोखले पुलाच्या दोन्ही बाजू खाली-वर होऊन त्यात 6 फुटांचे अंतर निर्माण झाल्याने महायुती सरकारची फजिती झालीये. आता हे काम पुन्हा करण्याची नामुष्की निर्माण झालिये.
- मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गाचे (NH 66) काम मागील दहा वर्षांपासून रखडले असून, यामुळे कोकणातील जनतेला प्रचंड त्रास सहन करावा लागतोय. अगोदर 400 कोटी अपेक्षित खर्चात हे काम पूर्ण होणार होते, तो खर्च आता 15,000 कोटींवर गेला आहे.




# महिला व बालके

## माताभगिनींविरोधात अवमानात्मक वक्तव्य

### महिलांचा अपमान करणा-या नेत्यांना पाठीशी घालण्याचं महायुतीचं काम.

- मंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री अब्दुल सत्तार, आ. प्रवीण दरेकर, खा. धनंजय महाडिक, आ. प्रशांत परिचारक, आ. गुलाबराव पाटील यांच्यासह महायुतीच्या ज्येष्ठ नेत्यांनी अत्यंत खालच्या पातळीवर जात माताभगिनींविरोधात आक्षेपार्ह टिका टिपण्णी केली. महाराष्ट्राच्या आदर्शवत राजकीय परंपरेला काळीमा फासणा-या या नेत्यांवर महायुती सरकारकडून मात्र कुठलीच कारवाई झाली नाही.

## महिलांवरील गुन्हेगारीचा उच्चांक

### महिलांचे संरक्षण करण्यात सरकार अपयशी.

- राज्यात महिलांविरोधातील गुन्ह्यांची आकडेवारी ही 2014 साली 26,818 इतकी होती. आज 2023 साली हीच संख्या 47,381 गुन्ह्यांवर येऊन पोहोचली आहे. महिलांवरील गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्र आता दुसऱ्या क्रमांकावर आला आहे. प्रत्येक तासाला महिलांविरोधात तब्बल पाच गुन्हे घडत आहेत. महिला अत्याचार, बलात्कार आणि अपहरणांच्या प्रकरणांमध्ये वाढ होत असताना महायुती सरकार मात्र ढिम्मपणे राज्यकारभार करत आहे.
- दिवसाला 130 महिलांवर अत्याचारांची नोंद महाराष्ट्रात होते, यातून महाराष्ट्रातील माता-भगिनींना संरक्षण देण्यात महायुती सरकार पूर्णतः अपयशी ठरत असल्याचे दिसून येते.

# वाढता महिला अत्याचार

## महिलांवर अत्याचार करणा-यांना सरकारचं समर्थन

- मंत्री धनंजय मुंडे, माजी खा. राहुल शेवाळे, मंत्री संजय राठोड, आ. गणेश नाईक, भाजप नेते किरीट सोमय्या, सोलापूर भाजप माजी जिल्हाध्यक्ष यांच्याविरोधात महिला अत्याचाराचे गंभीर आरोप असूनही त्यांच्याविरोधात कुठलीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. एकाच बेडवर भाऊ-बहिणींना विवस्त्र झोपवणारा पक्ष म्हणत सुधीर मुनगंटीवार यांनी एका महिलेचा अपमान केला होता.
- महिला अत्याचारांच्या प्रकरणात पोलीस गांभीर्याने तपास करत नाहीत, त्यांच्या तपासातील त्रुटीमुळे अनेक पीडितांना न्याय मिळत नाही, तसेच आरोपीला सुटण्यास मदत होते. असे निरीक्षण व्यक्त करत मुंबई उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे. पण असंवेदनशील महायुती सरकारला अजूनही यासंदर्भात जाग आलेली दिसत नाहीये.

# आशा आणि अंगणवाडी सेविकांचे हाल कायम...

## कमी वेतनप्रणाली आणि लाभापासून वंचित

- महाराष्ट्रातील आशा आणि अंगणवाडी सेविकांना किमान वेतनापेक्षा कमी वेतन मिळत आहे. शासनाकडून विविध कामांसाठी आशा व अंगणवाडी सेविकांना जुंपले जात असताना कर्तव्याच्या बदल्यात पुरेसा परतावा देखील आशा व अंगणवाडी सेविकांच्या वाट्याला येत नाही. निवृत्तीवेतन किंवा अन्य इतर लाभांपासून आशा व अंगणवाडी सेविकांना वंचितच राहावे लागत आहे.

# आरोग्य आणि पोषण अभियानाकडे दुर्लक्ष

## राजमाता जिजाऊ मिशन योजना भाषणात

- राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य आणि पोषण अभियान, 2005 मध्ये सुरु करण्यात आलेला अग्रगण्य उपक्रम आहे. परंतु महायुतीच्या राजवटीत या योजनेकडे सपशेल दुर्लक्ष करण्यात आले आहे. कुपोषण आणि बालमृत्यूसारख्या घटना रोखण्यात महायुती सरकार पूर्णपणे अपयशी ठरले आहे. योजना केवळ कागदापुरत्याच मर्यादित ठेऊन सर्वसामान्य माता व बालकांच्या आरोग्याकडे महायुतीकडून पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

# स्वस्त गॅस सिलेंडरचे ढोंगी आश्वासन

## सबसिडीच्या नावाखाली माताभगिनींची फसवणूक

- गेल्या दशकभरात गॅस सिलिंडरच्या किंमतीत अमूलाग्र वाढ झाली आहे. 2019 मध्ये, निवडणुकीपूर्वी, सरकारने उज्ज्वला योजनेतून बाहेर पडलेल्यांसाठी सबसिडी योजनेचे आश्वासन दिले होते परंतु त्याची अंमलबजावणी करण्यात सरकार अपयशी ठरले. 2014 पूर्वी 450 रुपयांना मिळणारा गॅस सिलेंडर हजार रुपयांवर जाऊन पोहोचला होता. परंतु लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने मतांच्या स्वार्थासाठी ही दरवाढ कमी केली होती. त्यामुळे निवडणुकीच्या तोंडावर 800 रुपये दर करुन जनतेची दिशाभूल करण्याचं काम सरकारने केलं. महाराष्ट्रातही आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वर्षाला 3 मोफत घरगुती गॅस सिलेंडर देण्याचा जुमला महायुती सरकारने काढलेला आहे.

# महिला बेपत्ता आणि बलात्कार

## माताभगिनींवरील अत्याचारात वाढ...

- देशात 2019 ते 2021 या तीन वर्षांत 13.13 लाख मुली आणि महिला बेपत्ता झाल्या आहेत. महिला व मुली बेपत्ता होण्यात महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्रात 1,78,400 महिला बेपत्ता झाल्या आहेत तर, 13,033 मुली बेपत्ता झाल्या आहेत. 2014 ते 2019 या काळात महाराष्ट्रात राष्ट्रीय महिला आयोगामध्ये बलात्कार/बलात्काराचा प्रयत्न या श्रेणींतर्गत 182 गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. महाराष्ट्रात 2015, 2016 व 2017 या वर्षांत महिलांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ झाली. 2015 मध्ये बलात्काराच्या 4 हजार 144 गुन्ह्यांची नोंद झाली, तर 2017 मध्ये 4 हजार 356 गुन्हे नोंदविले गेले. अपहरण व पळवून नेण्याच्या गुन्ह्यांमध्ये 2015 ते 2017 या कालावधीत दोन हजारांची वाढ झाली. 2015 मध्ये 5 हजार 96 गुन्हे नोंदविले गेले होते, तर 2017 मध्ये अपहरण व पळवून नेण्याच्या 7 हजार 117 गुन्ह्यांची नोंद झाली. सन 2015 मध्ये विनयभंगप्रकरणी 11 हजार 713 गुन्हे नोंदविण्यात आले होते. 2017 मध्ये याच प्रकारचे 12 हजार 238 गुन्हे नोंदविले गेले.
- बदलापूर पासून ते शिये (कोल्हापूर) पर्यंत कुठेच चिमुकल्या सुरक्षित नाहियेत हे दिसून आले आहेत. 2024 मध्ये जानेवारी ते ऑक्टोबर या कालावधीत मुंबईत 1254 छेडछाड आणि 549 बलात्कारांच्या घटना घडल्या आहेत. गृहमंत्र्यांच्या नागपूर मध्ये 304 छेडछाड आणि 165 बलात्काराच्या घटना घडल्या आहेत, तर उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या पुण्यात 364 छेडछाड आणि 124 बलात्काराच्या घटना घडल्या आहेत.

- राज्य सरकारच्या आर्थिक सर्वेक्षण अहवालातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. 2023 मध्ये राज्यात तब्बल 7,521 बलात्काराच्या घटना घडल्या आहेत. या आकडेवारी नुसार महाराष्ट्रात दर दिवसाला 21 बलात्काराच्या घटना घडतायत. या धक्कादायक माहितीवरुन असे दिसते की गुन्हेगारांना कायद्याची भीती राहिलेली नाहिये.



# आरोग्य

## सुविधांच्या नावाखाली आश्वासनांचा भोपळा

### तुटपुंज्या निधीत आरोग्यक्षेत्राचा कारभार सुरु.

- कोरोना महामारीत आरोग्याच्या निगडित भासलेल्या समस्या लक्षात घेऊनदेखील महायुती सरकारने राज्याच्या 2023-24 आणि 2024-25 या आर्थिक वर्षात पूर्ण अर्थसंकल्पाच्या 4.6 टक्के इतकी तुटपुंजी तरतूद आरोग्य विभागासाठी केली, जी राष्ट्रीय सरासरी 6.2 टक्क्यांपेक्षा कमी आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आरोग्यावरील खर्च दुप्पट करण्याचे आश्वासन दिले होते परंतु पुढे त्याची अंमलबजावणी झाली नाही.

## सरकारी रुग्णालयात कर्मचाऱ्यांची वानवा

### रिक्त पदांमध्ये वाढ, संसाधनांचाही अभाव

- महाराष्ट्रातील सरकारी रुग्णालयांमध्ये वैद्यकीय आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांमध्ये 15% रिक्त जागा आहेत परंतु सरकारकडून मात्र रिक्त पदे भरण्यासाठी कुठलीच पावलं उचलली जात नाहीत. तसेच निधीची कमतरता, अपुरी वैद्यकीय यंत्रणा, आरोग्य क्षेत्रातील वाढता भ्रष्टाचार आणि रुग्णालयांवरील प्रचंड भार यामुळे रुग्णांना निकृष्ट आरोग्यसेवेला सामोरं जावं लागत आहे.

## MJPJAY योजना अयशस्वी

### लाभापासून रुग्ण वंचितच...

- राज्याने महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) अंतर्गत विमाकवच हे 1.5 लाखांवरुन 5 लाख रुपयांपर्यंत वाढवले असले तरी, निविदा प्रक्रियेतील विलंबामुळे कोट्यवधी लाभार्थ्यांना या योजनेपासून वंचित राहावे लागले. शिवाय, MJPJAY योजनेला राज्यातील अनेक नोंदणीकृत रुग्णालयांकडून केराची टोपली दाखवली जात असताना तसेच रुग्णांची फसवणूक होत असताना सरकारकडून मात्र कुठलीच कारवाई केली जात नाही.

## वैद्यकीय महाविद्यालयांच्या नावाखाली आश्वासनांच्याच फैरी...

### घोषित प्रकल्प रखडलेलेच...

- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ऑक्टोबर 2023 मध्ये 34 सुपरस्पेशालिटी रुग्णालये आणि मार्च 2024 मध्ये 10 नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये राज्यात उभारण्याचे आश्वासन दिले होते. परंतु या घोषणा कागदापुरत्याच मर्यादित राहून या प्रकल्पांमध्ये कोणतीही प्रगती झालेली नाही. परिणामी राज्यातील आरोग्यसेवा पायाभूत सुविधा या रखडलेल्याच असून यामुळे आरोग्यक्षेत्रावर मोठा ताण निर्माण होत आहे.

## उडता महाराष्ट्र

### महाराष्ट्र राज्य हे आता ड्रग हब होण्याची भिती...

- तब्बल 300 कोटी रुपयांच्या ड्रग तस्करी प्रकरणातील आरोपी ललित पाटीलचे प्रकरण समोर आल्यानंतर महायुतीचा ड्रग तस्करांना असणारा पाठिंबा उघड झाला आहे. राज्यात विविध पब, बारमध्ये अवैद्य धंदे सुरु असून त्यांच्याकडून केवळ वसुली करण्याचं काम महायुती सरकार करत आहे. महायुतीच्या राजवटीत ड्रग तस्करी वाढली असून युवा पिढीला उध्वस्त करण्याचं काम राज्यात सुरु आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच सुमारे 50,000 कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त केल्याची कबुली देत महायुतीच्या अंतर्गत महाराष्ट्र हा 'उडता महाराष्ट्र' होण्याच्या मार्गावर असल्याचे एकप्रकारे स्पष्ट केले आहे. शिंदे गटाच्या महिला पदाधिकारी यांना नुकतेच गांजा तस्करी केल्याप्रकरणी तेलंगना पोलिसाकडून अटक करण्यात आली होती.

## रुग्णालयात मृत्यूकांड

### गैरसोयीमुळे शासकीय रुग्णालयांमध्ये रुग्णांचा जातोय नाहक जीव.

- ठाण्यातील कळवा शासकीय रुग्णालयात 36 तासात 22 जणांचा मृत्यू, नांदेड शासकीय रुग्णालयात 24 तासात 24 मृत्यू, छत्रपती संभाजीनगर शासकीय रुग्णालयात 24 तासात 10 मृत्यू झाले होते. राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये सुरु असणारा रुग्णालय कांड अद्याप सुरुच असून जून महिन्यात 21 नवजात अर्भकांचा मृत्यू झाल्याची घटना कळवा रुग्णालयात घडली. राज्यातील या रुग्णालय कांडाकडे महायुती सरकारने दुर्लक्ष केलेलं आहे. पुण्यातील ससून रुग्णालय प्रशासनाचाही रुग्णांच्या जीवाशी चालू असलेला खेळ नुकताच समोर आला होता.

## महाराष्ट्राशी दुजाभाव

### कोरोना काळात महायुतीची महाराष्ट्रविरोधी भूमिका

- कोरोनाच्या महामारीत केंद्राकडून महाराष्ट्राला निकृष्ट दर्जाचे व्हेंटिलेटर देण्यात आले. तसेच कमी प्रमाणात लसींचा पुरवठा करण्यात आला. याच काळात राज्यातील भाजपच्या नेत्यांकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीऐवजी प्रधानमंत्री सहाय्यता निधीस मदत करण्यात आली. महाराष्ट्रविरोधी भूमिका घेण्याचं काम भाजपच्या नेत्यांनी केलं.

## आरोग्यातही महायुतीचा भ्रष्टाचार

### रुग्णवाहिका, आरोग्य सुविधांच्या कंत्राटांमध्ये घोटाळा

- महायुती सरकारकडून राज्यातील रुग्णवाहिकांमध्ये तब्बल 10 हजार कोटी रुपयांचा घोटाळा करण्यात आला आहे. HLL कंपनी ही बोगस बिलं काढण्यासाठी वादात सापडली होती तरीही HLL कंपनीला कुठलेही टेंडर न काढता दोन हजार कोटी रुपयांचं कंत्राट देण्यात आले आहे. महायुती सरकारने नियमबाह्य पध्दतीने टेंडर काढून तब्बल 2 हजार कोटी रुपयांचा घोटाळा केला आहे.

## मूलभूत औषधांचा तुटवडा

- मुंबईच्या प्रतिष्टीत जे जे रुग्णालयात देखील, औषधेच्या तुटवड्यामुळे रुग्णांना औषधी बाहेरून खरेदी करावे लागतात. ज्यामध्ये अपलोडिपिन, ऑगमेंटिन, मल्टी विटामिन सारखी औषधींचा समावेश. महायुती सरकारने वैद्यकीय खरेदी कक्ष केवळ नावालाच स्थापन करून ठेवलाय हे यावरून अधोरेखित होते.
- पुण्यासारख्या शहरी भागात देखील क्षयरोगाच्या (टीबीच्या) औषधांचा तुटवडा जाणवला आहे. ज्यामुळे अनेक रुग्णांना एकतर औषधी देणे मुश्किल झाले आहे, त्यामुळे संसर्ग वाढायची देखील भीती संभवते.

- 2003 साली डॉ. सुभाष साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली 'आरोग्य साहित्य संपादन समिती'च्या माध्यमातून खरेदी चालू असल्याने कोणताही तुटवडा जाणवला नाही. पण आता वेगळी यंत्रणा बसवून देखील अनेक वेळा औषधींचा तुटवडा जाणवत आहे. कारण समिती केवळ कागदावरच राहिली असून, 90% मागणी ही हाफकीन या संस्थेकडून घेतली असल्याने केंद्रीकरणाचा धोका निर्माण झाला आहे.

## इतर अभाव

- सर्वसाधारणपणे एक हजार लोकसंख्येमागे रुग्णालयांतील खाटांचे प्रमाण 3 असणे आवश्यक आहे. भारतात हे प्रमाण केवळ 1.3 आहे. त्यामुळे एक हजार लोकसंख्येमागे 1.7 खाटांची तूट भरण्यासाठी आणखी 24 लाख खाटांची आरोग्य सुविधा निर्माण करावी लागेल. परंतु यासंदर्भात केंद्र आणि राज्य सरकार गांभीर्याने विचार करतांना दिसत नाहियेत.

**जगभरातील आरोग्य व्यवस्थेचे चित्र**

| देश | हजार जणांमागे खाटा | हजार जणांमागे डॉक्टर |
|---|---|---|
| अमेरिका | 2.9 | 2.6 |
| ब्रिटन | 2.5 | 5.8 |
| चीन | 4.3 | 2 |
| जपान | 13 | 2.5 |
| भारत | 1.3 | 0.9 |

## प्राथमिक आरोग्य केंद्रांची दुरावस्था

- राज्याच्या आरोग्य विभागाची अवस्था दिवसेंदिवस दयनीय होत चालली असून, एकीकडे आरोग्य विभागाच्या रुग्णालय बांधणीसाठी तसेच देखभालीसाठी वित्त विभागाकडून पुरेसा निधी दिला जात नाही. तर दुसरीकडे हजारोंनी रिक्त असलेली डॉक्टर व अन्य कर्मचाऱ्यांची पदे भरली जात नाहीत.
- ग्रामीण आरोग्याची मदार असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांची अवस्था अत्यंत वाईट असून जवळपास 233 प्राथमिक आरोग्य केंद्र एक तर मोडकळीला आली आहेत, वा धोकादायक म्हणून जाहीर झालेली असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे.

## आरोग्य विभाग झालाय भ्रष्टाचाराचा अड्डा

- महायुती सरकारच्या गलथान आणि भ्रष्ट कारभारामुळे, सरकारी रुग्णालयात औषधी ऐवजी रुग्णांना देतायेत चेहऱ्याला लावायचे चंदन पावडर.
- कोल्हापूरच्या सीपीआर या शासकीय रुग्णालयामध्ये नऊ कोटी 46 लाख रुपयांचा औषध खरेदीचा टेंडर घोटाळा उघडकीला आलाय. बनावट प्रमाणपत्राद्वारे औषध खरेदीचा ठेका घेऊन सीपीआरची एका खाजगी कंपनीने फसवणूक केल्याचे सिद्ध झालंय.
- मात्र याप्रकरणी नेमलेल्या उच्चस्तरीय चौकशी समितीने ठेकेदार कंपनीला केवळ ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्याचं सांगत जुजबी कारवाई केलीय. त्यामुळे फसवणूक करणाऱ्या ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्यात कुचराई केल्याचे समोर आले आहे.
- आणखी एका प्रकरणात कोल्हापूरच्या याच सीपीआर हॉस्पिटलमध्ये बनावट कागदपत्र आणि बोगस दराने एका कंत्राटदाराने पाच कोटींच्या साहित्याचा पुरवठा केल्याचे देखील उघड झाले आहे.
- सार्वजनिक बांधकाम विभागाने जे. जे. समूह रुग्णालयाच्या इमारतीची देखभाल दुरुस्तीची कामे कागदोपत्री दाखवून 34 कोटींची बिले काढल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या घोटाळ्यामुळे रुग्णांसाठी अपेक्षित असलेली कामे झाली नाहीत.

हक्क मागतोय महाराष्ट्र



# शिक्षण

## पेपरफुटी घोटाळा

### मेहनती विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ, शैक्षणिक भ्रष्टाचार

- नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडून घेण्यात येणा-या परिक्षांमध्ये 2019 ते 2024 या कालावधीत झालेल्या घोटाळ्यामुळे आजवर 1.4 कोटी विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागला. यापैकी महाराष्ट्रातील तब्बल 11.3 लाख विद्यार्थ्यांच्या भविष्यात पेपरफुटी घोटाळ्यामुळे अडथळा निर्माण झाला. नुकत्याच उघडकीस आलेल्या NEET आणि युजीसी नेट परिक्षांमध्ये झालेल्या घोटाळ्यातून भाजपचा संबंध उघडकीस आला. शिवाय पेपरफुटी प्रकरणावर पांघरुण घालण्याचा प्रयत्न देखील भाजप सरकारकडून करण्यात आला.

## खासगी शाळांकडून अव्वाच्या सव्वा शुल्क आकारणी

### आरटीई योजना राबवण्यास सरकार अपयशी.

- तीन ते चार वर्षांपासून शिक्षण हक्क कायद्यांतर्गत प्रवेश घेतलेल्या खासगी विनाअनुदानित शाळांना भरपाई देण्यात महायुती सरकार अपयशी ठरले आहे. आता, सरकारी शाळांच्या एक किलोमीटर परिघातील खासगी शाळांना आरटीई कोट्यातील 25% जागा राखीव ठेवण्यापासून सूट दिल्याने गोरगरीब पालकांवर शैक्षणिक शुल्काचा आणखी बोजा पडत आहे परिणामी विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार

# शिष्यवृत्ती रखडली

## शिष्यवृत्तीचा लाभ मिळवण्यात विद्यार्थ्यांना अडथळे.

- सरकारने परदेशी शिष्यवृत्ती योजनेंतर्गत एससी, एसटी आणि ओबीसी विद्यार्थ्यांसाठी कट ऑफ 60% वरून 75% पर्यंत वाढवला आहे आणि 8 लाख रुपये उत्पन्न मर्यादा ठेवण्यात आली आहे. परिणामी विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेण्याची संधी नाकारली जात असून परदेशात जाऊन उच्चशिक्षण घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांच्या भविष्यावर परिणाम होत आहे.

# क्लस्टर शाळा धोरण चुकीचे

## हजारो शाळा बंद होण्याचा धोका

- क्लस्टर स्कूल धोरणाला शिक्षक, पालक आणि शिक्षणतज्ज्ञांनी विरोध केल्याने संपूर्ण महाराष्ट्रातील 14,000 शाळा बंद होण्याचा मोठा धोका आहे. मोठ्या प्रमाणावर विरोध होत असताना देखील महायुती सरकारने हे विनाशकारी धोरण रद्द करण्यास नकार दिला आहे. यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या रोजगारावर गदा येण्याची दाट शक्यता आहे.

# विद्यार्थ्यांची गळती (Drop Out)

## शिक्षण व्यवस्था धोक्यात.

- महायुतीच्या राजवटीत प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांचे शाळा सोडण्याचे प्रमाण हे पाच पटीने वाढले आहे. तर माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांचे शाळा सोडण्याचे प्रमाण दुप्पट झाले आहे. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये विद्यार्थी गळतीचे प्रमाण हे 15 टक्के नोंदवले गेले आहे. यातून महायुती सरकारच्या शैक्षणिक धोरणातील अनास्था आणि शिक्षण व्यवस्थेतील गलथान कारभार स्पष्ट होतो.

# बुरसटलेली मानसिकता

## मनुस्मृतीचा अभ्यासक्रमात समावेश करुन शैक्षणिक व्यवस्थेतही राजकारण

- महायुतीने मनुस्मृतीमधील काही भाग राज्याच्या शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. राजकीय स्वार्थासाठी पाठ्यपुस्तकांमध्ये इतिहासाचे पुनर्लेखन करण्याचा डाव सत्ताधाऱ्यांकडून आखला जात आहे. सत्ताधाऱ्यांकडून अशी कृत्ये करुन सामाजिक तेढ निर्माण करण्याचं काम सुरु आहे.

# शिक्षण विभागाला लागलीये भ्रष्टाचाराची कीड

- राज्यातील 36 शिक्षण अधिकाऱ्यांची चौकशी करण्याचे पत्र शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी एसीबीला लिहिले आहे. शिक्षण विभागात मोठा भ्रष्टाचार सुरू असल्याने आयुक्तांनी एसीबीला पत्र लिहिले आहे.
- अधिकारी लाच घेतांना पकडले जातात मात्र पुन्हा सेवेत येतात, पुन्हा भ्रष्टाचार करतात पण कारवाई होत नाही. यामुळे शिक्षक त्रस्त झाले आहेत.
- **शिक्षण विभागातील भ्रष्टाचाराचे दर पत्रक**
    - कायम मुख्याध्यापक मान्यतेसाठी - एक ते दीड लाख रुपये
    - शालार्थ प्रकरणांसाठी - 80 हजार ते एक लाख रुपये
    - मेडिकल बिल मंजुरीसाठी - बिलाच्या रकमेच्या पाच ते 20 टक्क्यांपर्यंत
    - शिक्षक बदलीसाठी - 50 हजार ते दोन लाख रुपयांपर्यंत

# स्वातंत्र्य दिन गणवेशाविना

- महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने यंदा पहिली ते आठवीच्या मुलांना मोफत गणवेशाची घोषणा केली. परंतु भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी राज्यातील सुमारे 36 लाख 41 हजार विद्यार्थ्यांना गणवेश मिळाला नाही.
- पुणे, रत्नागिरी, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, वर्धा, गोंदिया, अमरावती, वाशिम, बुलढाणा, अकोला, लातूर, धाराशीव, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, सोलापूर, रायगड, धुळे, नाशिक या जिल्ह्यांतील मुलांना स्वातंत्र्य दिनी एकही गणवेश वाटप झाला नाही.
- महायुती सरकारच्या ढिसाळ आणि असंवेदनशील कारभारामुळे चिमुकल्यांवर शालेय गणवेशाविना स्वातंत्र्य दिन साजरा करायची नामुष्की ओढवली.

## आधी शाळा बंद करण्याचा प्रयत्न आता कंत्राटी भरतीचा मार्ग

- राज्यातील 20 पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याचा निर्णय मध्यंतरी राज्य सरकारने घोषित केला होता, त्याला झालेला विरोध लक्षात घेऊन या शाळा बंद करणार नसल्याचा निर्णय राज्य सरकारला घ्यावा लागला.
- परंतु आता शिक्षक दिनाच्या दिवशीच शिक्षकांची कूर थट्टा करण्याचा प्रयत्न महायुती सरकारने केला आहे. आता या 14,000 शाळांमध्ये कंत्राटी स्वरूपाची भरती राबवण्यात येणारा असून, याचा 'शिक्षक पात्रता टेस्ट' (टीईटी) उत्तीर्ण पात्रता धारक शिक्षकांवर थेट परिणाम होणार आहे.
- तसेच योग्य गुणवत्ता नसलेल्या शिक्षकांची भरती करून, या शाळांतील विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी देखील महायुती सरकार खेळत आहे

## सरकारी शाळांची दुरावस्था आणि महायुती सरकारची अनास्था

- बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील बाहेगव्हाण शाळेंतर्गत येणाऱ्या वंजारवाडी वस्तीवरील विद्यार्थ्यांना मागील 10 वर्षांपासून इमारतच नाहिये. वस्तीवरील ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून शाळेसाठी पत्र्याच्या शेडची उभारणी केली होती. वादळवाऱ्यात पत्र्याचे शेड उडुन गेले त्यामुळे आता, विद्यार्थ्यांना झाडाखाली बसुन शिक्षण घेण्याची वेळ आली आहे. तसेच जर पाऊस आला तर गोठ्यात बसुन शिक्षण घ्यावे लागतेय.
- मुख्यमंत्री 'माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानाचा नुसताच गाजावाजा करण्यात आलाय. बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यातील पहाडी पारगावची जिल्हा परिषद शाळा उघड्यावर भरते. अतिवृष्टीमुळे वर्गखोल्या ढासळल्या तरी प्रशासनाला जाग आलेली दिसत नाहीये.
- धुळे जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांची दुरावस्था झाली असून जिल्हा परिषदच्या 162 शाळांमधील तब्बल 398 वर्ग खोल्या ह्या पडक्या व जीर्ण झाल्या आहेत. त्यांच्या दुरुस्ती संदर्भात राज्य सरकारची अनास्था दिसून येतेय, तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचे कोणाला काही देणेघेणे नाही, हे देखील अधोरेखित होते.

## विद्यार्थी आत्महत्यांत देखील महाराष्ट्र पहिल्या स्थानी

- एनसीआरबी अहवालानुसार देशात विद्यार्थ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत. ज्यामध्ये दुर्दैवाने महाराष्ट्रातील विद्यार्थी आत्महत्या सर्वाधिक आहे. यासंदर्भात राज्यातील महायुती सरकारने गांभीर्याने पाऊले उचलणे आवश्यक होते, पण तसे काही होतांना दिसत नाहियेत.

| राज्ये | विद्यार्थी आत्महत्या | एकूण विद्यार्थी आत्महत्या |
|---|---|---|
| महाराष्ट्र | 1764 | 14% |
| तामिळनाडू | 1416 | 11% |
| मध्य प्रदेश | 1340 | 10% |
| उत्तर प्रदेश | 1060 | 8% |
| झारखंड | 824 | 6% |

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
# शरदचंद्र पवार

---

## हक्क मागतोय महाराष्ट्र

Scan For More Information

**7030120012**

**मिसकॉल द्या, सहभागी व्हा!**

www.hakkmagtoymaharashtra.com